अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com सोमवार दि. २१ नोव्हेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ५५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## भरदिवसा वृध्देचे साडेतीन तोळ्यांचे दागिने लुटले

✔ सुराज्य/सोलापूर

विजापूर रस्त्यावरील भारती विद्यापीठाजवळील नेताजी सुभाष हाउसिंग सोसायटी येथे दूधवाल्याचा पाहुणा असल्याची थाप मारून चोरट्यांनी वृध्द महिलेच्या गळ्यातील साडेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने लुटून नेल्याची घटना घडली. रविवारी भरदिवसा घडलेल्या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत ऊर्मीला देविदास गोगी (वय-७५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अनोळखी चोरट्यांच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी व त्यांचे पती आपल्या घरी असताना रविवारी सकाळी ११ च्या सुमारास मोटारसायकलवरुन दोन चोरटे त्यांच्या घराजवळ आले. त्यातील एकाने फिर्यादीच्या पतीला मी तुमचा दूधवाला भोसले याचा पाहुणा आहे, तुम्ही दुधाची चीक घ्या असे सांगितले. तेव्हा पतीने पत्नी ऊर्मीला यांना सांगितल्यानंतर त्या घरातील भांडी आणून अंगणात दुधाची चीक घेण्यासाठी खाली वाकल्या असता चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण व दीड तोळ्याची सोन्याची माळ असे ८५ हजार रुपयांचे साडेतीन तोळ्यांचे दागिने जबरदस्तीने हिसका मारून तोडले व दोघेही मोटारसायकल वरून वेगाने निघून गेले. काही समजायच्या आतच ही घटना घडली. भरदिवसा गजबजलेल्या भागात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी विजापूर नाका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आ. बांगरांच्या चेल्यांची पंढरीत झुंडशाही

## गार्डला बदडले, शुटिंगचे मोबाईलही फोडले

## झिंगलेल्या अवस्थेत आले, मारहाण करुन गेले

✔ सुराज्य/पंढरपूर

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील मातब्बर, तगडे व नेहमीच वादग्रस्त ठरलेले हिंगोलीचे आमदार संतोष बांगर यांच्या कार्यकर्त्यांनी पंढरपूरला आल्यानंतर विश्रामगृहातील रुम देण्याच्या कारणावरून तिथल्या गार्डला बेदम मारहाण केली. शनिवारी रात्री साडे अकराच्या सुमारास हा प्रकार घडला. या मारहाणीत सुरक्षा रक्षक म्हणून कर्तव्य बजावणारे सौरभ कदम यांना मुका मार लागला आहे. मारहाणीचे चित्रीकरण करताना या कार्यकर्त्यांनी शिवीगाळ करत त्यांचा मोबाईलही फोडून टाकला. आमदार नसताना त्यांचे चेले कशी झुंडशाही करतात? सोबत आमदार असतील तर त्यांचा 'प्रताप' काय असू शकेल? असा संतापजनक प्रश्न पंढरपूकरांमधून उपस्थित केला जात आहे.**

झाले असे की- शिंदे सरकारमधील एक मंत्री डॉ. सुरेश खाडे हे दर्शनासाठी रविवारी पंढरपूरला आले होते. त्यासाठी शनिवारीच विश्रामगृहातील खोल्या बुक झाल्या होत्या. कदम हे नेहमी प्रमाणे आपली सेवा बजावत असताना एका कारमधून पाचजण विश्रामगृहावर आले. त्यांनी कदमांकडे रुम देण्याची मागणी केली. कदम यांनी बुकिंग केले आहे का? अशी विचारणा केली. बुकिंग केल्याशिवाय रुम दिली जात नसल्याचे कदम यांनी स्पष्ट केल्यानंतर मद्यधुंद अवस्थेत असलेल्या या कार्यकर्त्यांनी कदम यांना दमबाजी सुरु केली. आम्ही आमदार संतोष बांगर यांचे कार्यकर्ते आहोत, असे म्हणत रुम उघडून देण्यासाठी दबाव आणू लागले. दरम्यान त्यातील एकाने आमदार बांगर यांना फोन लावून रुम देत नसल्याची तक्रार केली. सारेजण चिडून कदम यांना मारहाण करायला सुरूवात केली. कदम यांनी मारहाणीचे चित्रीकरण आपल्या मोबाईलमध्ये केल्यानंतर हे कार्यकर्ते अजून भडकले. शुटिंग करतोय काय म्हणत कदम यांना परत मारहाण करून शिवीगाळही केली.





गार्डला मारहाण करणारे हेच ते कार्यकर्ते.

### आमदारही भडकले...

मारहाण करून हे कार्यकर्ते थांबले नाहीत तर आ. बांगर यांच्यापर्यंत त्यांची मजल गेली. त्यानंतर खुद्द बांगर यांनी मोबाईलवरुन त्या सुरक्षा रक्षकाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन रुम उघडून देण्यासाठी दमबाजी केली. आमदारांनी दमबाजी करुन देखील रुम देत नसल्याने कार्यकर्त्यांनी त्या कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली. मारहाण करणारे झिंगलेल्या अवस्थेत होते, असे हा प्रकार पाहिलेल्यांनी सांगितले. बांगर यांच्या कार्यकर्त्यांनी कदम यांना बेदम मारहाण करुन पळ काढला. सदरची घटना रात्री उशिरा घडल्याने कदम यांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली नाही मात्र घडलेली घटना पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे यांच्या कानावर घातली. पोलीस कारवाई बाबत गावडे हे वरिष्ठांशी बोलून निर्णय घेणार असल्याचे समजते.

### अजूनही झुंडशाहीच...

'मातोश्री'चे निष्ठावंत असणारे बांगर हे सत्तांतर झाल्यानंतर शिंदे गटात दाखल झाले. त्यानंतर त्यांची एक एक वागणूक गेल्या दोन महिन्यात वादग्रस्त ठरते आहे. मंत्रालयात कार्यकर्त्यांना अडवल्याबद्दल बांगर यांनी चक्क पोलिसालाच शिवीगाळ केली. तू मला काय शिकवतो का? अशी भाषा त्यांनी वापरली. हा प्रकार ४ नोव्हेंबरला घडला. त्यानंतर पोलीस दलाने बांगर यांच्याविषयीचा एक अहवाल सरकारकडे पाठवला आहे. बांगर यांनी ज्या पोलिसाला शिवीगाळ केली, तो माजी सैनिक असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे बांगर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. असे असताना अजूनही त्यांच्याकडून व त्यांच्या चेल्यांकडून झुंडशाहीचे प्रकार सुरू व्हावेत, ही राज्याची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

## बार्शीत साडेसात लाखांचे सोने घेऊन कारागीर पसार

✔ सुराज्य/बार्शी

सराफाने दागिने करण्यासाठी विश्वासाने दिलेले १४ तोळे सोने घेऊन कारागीर पसार झाल्याची घटना बार्शी येथे उघडकीस आली आहे. सराफ व्यावसायिकाचे यात सुमारे साडेसात लाखांचे नुकसान झाले आहे. याबाबत येथील सराफ व्यावसायिक तन्मय रवींद्र बुडूख (रा. सुभाषनगर, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी लालटू सुबल खेत्रपाल (सध्या रा. दाणेगल्ली, महाजन बोळ, बार्शी मूळ रा. सोनाटिकरी (कँकड) (पारा) पांडुआ पश्चिम बंगाल) याच्याविरूध्द बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादीचे किराणा रोड येथे बाळकृष्ण लक्ष्मण बुडूख नावाने वडिलोपार्जित सराफी दुकान आहे. सोने चांदीचे दागिने ऑर्डर प्रमाणे तयार करून देण्याचा व्यवसाय ते करतात. लालटू हा गेले सात ते आठ वर्षापासून बार्शीमध्ये सोनेचांदीचे दागिने बनवून देण्याचे काम करत होता. फिर्यादी हे मागील एक वर्षापासून लालटू यास सोने देऊन त्याच्याकडून दागिने बनवून घेत असत.



दि. २५ ऑक्टोबर व दि. २ नोव्हेंबर २२ रोजी फिर्यादी तन्मयने लालटू खेत्रपाल यास लेडिज अंगठी, कलकत्ती बांगड्या, गंठण, कोईमतूर झुबे व टॉप्स इ. प्रकारचे दागिने बनविण्यासाठी १४२ ग्रॅम ३७० मिली एवढे सोने दिले होते. सदर सोन्यापासून दि. ५ नोव्हेंबर पर्यंत सांगितल्याप्रमाणे दागिने बनवून देतो असे लालटूने फिर्यादीस सांगितले होते. ठरल्याप्रमाणे दि. ५ रोजी दागिने बनवून न दिल्याने फिर्यादी स्वत: दि. ६ रोजी लालटूचे दाणे गल्ली, महाजन बोळात असलेल्या दुकानात गेले. त्यावेळी लालटूने दोन दिवसापासून तब्येत बरी नसल्याने दागिने बनविण्याचे काम झाले नाही, तुमचे दागिने दि. ८ नोव्हेंबर पर्यंत देतो असे सांगितले. त्याचेवर विश्वास ठेवून फिर्यादी परतले. दि. ७ रोजी सायंकाळी ७ वा. चे सुमारास फिर्यादीने लालटूला फोन केला. फोन न लागल्याने त्यांनी दुकान कामगारास त्याचेकडे पाठविले असता कामगाराने लालटूच्या दुकानास कुलूप असल्याचे व तो पळून गेल्याची चर्चा असल्याचे फोन करून सांगितले. त्यामुळे फिर्यादी स्वत: त्याठिकाणी गेले त्यावेळी नक्षत्र ज्वेलर्स यांचेही सोने घेऊन लालटू पळून गेला असे समजले. फिर्यादी व इतरांनी त्याचा बार्शी बसस्थानक, रेल्वेस्थानक सोलापूर, कुर्डूवाडी व हैदराबाद आदी ठिकाणी शोध घेतला परंतु तो सापडला नाही. अखेर तो पळून गेल्याची खात्री झाल्याने त्यांनी तक्रार दिली. ७ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

## आसरा चौकातील व्ही. पवार साडी दुकानाला आग

### ५० लाखांचे नुकसान; एका तासात आग आटोक्यात



✔ सुराज्य/सोलापूर

जुळे सोलापुरातील आसरा पुलाखालील असलेल्या व्ही. पवार या दोन मजली साडी सेंटरला रविवारी सायंकाळच्या सुमारास आग पहिल्या मजल्यास आग लागल्याने लाखो रुपयांचे साड्या, सिल्क साड्या व होजियरी साहित्य जळून नष्ट झाले. पण वेळीच ही आग आटोक्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. दुकानातील एसीमुळे ही आग लागल्याचे प्राथमिक माहितीतुन पुढे आले आहे. रविवारी सायंकाळी साडेसहा वाजता साडी सेंटरचे मालक संतोष सुरेश पवार हे पहिल्या मजल्यावर बसले असताना ए. सी. सुरू करत असताना अचानक शॉर्टसर्किट होऊन आग लागली. ते तात्काळ खाली पळत आले. त्यावेळी दुकानात कामगार वर्ग होता. तर दुसऱ्या मजल्यावर मोठ्या प्रमाणात साड्या, ड्रेस मटेरियल, होजियरी, तसेच सिल्क साड्या, प्लास्टिक गाद्या होत्या. आग विझवण्यासाठी ते तात्काळ खाली येऊन शेजारच्या दुकानातून आग विझवण्याचे मशीन शोधत असताना दरम्यानच्या वेळात आग मोठ्या प्रमाणात भडकली. त्यांनी तात्काळ अग्निशामक दलास तसेच पोलीस ठाण्याला फोन केला. होटगी रोड येथील अग्निशामक दलाची गाडी त्या ठिकाणी तात्काळ पोहोचल्या. तसेच विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पथक त्या ठिकाणी पोचले. दोन गाड्यांच्या पाण्याच्या फवाराने ही आग आटोक्यात आणली. या आगीत पहिल्या मजला पूर्ण जळून खाक झाला. त्यांनी वेळीच अग्निशामक दलाला सांगितल्यामुळे आग तळघरापर्यंत पोचली नाही. कारण दुकानातील साहित्य तळघरातच होतं. या आगीच्या दुर्घटनेत जवळपास ५० लाखाचे नुकसान झाल्याचे पवार यांनी अग्निशामक दलास सांगितले.

### वेळेवर आल्या अग्निशामक दलाच्या गाड्या

या शोरूमच्या बाजूलाच मोठे गोडा असून गोडाऊन त्यात लाखो रुपयेच्या साड्या, ड्रेस मटेरियल होते. जर अग्निशामक दलाच्या गाड्या त्या ठिकाणी वेळेवर पोचल्या नसत्या तर हा आगीचा भडका गोडाऊन पर्यंत पोहोचून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असते.

## वैरागवाडीत सत्तुरने खुनाचा प्रयत्न; तिघांविरुध्द गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

शेतात अँगल मारण्याच्या कारणावरून कोयता, काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना वैरागवाडी (ता. मोहोळ) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी तिघांविरुध्द खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात जखमी कृष्णदेव सौदागर कदम (वय २४ रा. वैरागवाडी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी नितीन दगडे, सतीश दगडे, आणि शरद ढेकळे या तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला. कृष्णदेव कदम हे आपले वडील आणि भावासोबत शेतातील बांधावर अँगल मारण्याचे काम करीत होते. त्यावेळी तिघे आरोपी घटनास्थळी आले आणि माझ्या शेतात अँगल रोवायचे नाही. असे म्हणत कृष्णदेवच्या डोक्यात कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केले. त्यावेळी त्यांचे वडील व भाऊ सोडवण्यास आले असतात त्यांना देखील तिघांनी काठीने मारून जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार राठोड करीत आहेत.




## पुण्यात नवले पुलाजवळ ४८ वाहनांचे नुकसान

✔ सुराज्य/पुणे : मुंबई-बंगळुरू बाह्यवळण महामार्गावर अपघातांचे सत्र कायम आहे. रविवारी रात्री बाह्यवळण मार्गावर झालेल्या अपघातात टँकर चालकाचे नियंत्रण सुटले. टँकरच्या धडकेने ४८ वाहनांचे नुकसान झाले असून ३० ते ३५ जण जखमी झाले आहेत.

नवले पुलाजवळ तीव्र उतारावर टँकर चालकाचे नियंत्रण सुटले. टँकरच्या धडक दिल्यानंतर वाहने आदळली. अपघातात ४८ वाहनांचे नुकसान झाले. टँकरची पाठीमागून धडक बसल्याने वाहने एकमेकांवर आदळली. त्यामुळे या परिसरात गोंधळ उडाला. या घटनेची माहिती अग्निशमन दलाच्या रेस्क्यु व्हॅन तसेच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



विकासाचा मुद्दाच राहिला नाहीये!!

### उमेश पाटलांनी राजनमालकांचे आव्हान स्वीकारले...

## माझ्यासमोर येऊन लढा, हरलो तर संन्यास घेईन

✔ सुराज्य/मोहोळ

माझ्या विरोधात या तुम्ही तुमचा अनगर मतदार संघ सोडा, मी माझा नरखेड मतदार संघ सोडतो तालुक्याच्या कुठल्याही ओपन असलेल्या मतदारसंघातून होणारी जिल्हा परिषद निवडणूक तुम्ही स्वतः लढा मीही लढतो हरलो तर राजकीय संन्यास घेईन, असे ओपन चॅलेंज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी राजन पाटील यांना दिला आहे.

मागील दोन दिवसांपूर्वी माजी आमदार राजन पाटील यांनी सोलापूर येथे पत्रकार परिषद घेऊन उमेश पाटील यांच्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेतला होता. आपल्याविरूध्द निवडून येण्याबाबत त्यांनी आव्हान दिले होते. राजन पाटलांच्या आव्हानाला प्रतिआव्हान देण्यासाठी उमेश पाटील यांनी मोहोळ येथे रविवारी येथे पत्रकार परिषद घेतली.

जिल्हा परिषदेचे तिकिट वाटपाचे अधिकार हे प्रदेश अध्यक्षांकडे असतात आणि उमेश पाटील यांना त्यांनीच तिकिट दिलं होतं आणि तो अधिकार त्यांनाच असतो, असे सांगत असतानाच स्थानिक नेत्यांची मते विचारत घेतली जातात. त्यामुळे मला माझ्या नेत्यांनी त्यांना भेटावयास सांगितल्यामुळे मी त्यांना भेटलो होतो. यामध्ये वावगे काय ? असा सवाल उमेश पाटील यांनी उपस्थित केला. मी तुमच्याकडे आलो म्हणजे तुम्ही पक्षाचे मालक नाही असे ठणकावून सांगून मी २०१२पासून पक्षाचा मुख्य प्रवक्ता आहे राज्यातील वृत्तवाहिन्या व इतर प्रसारमाध्यमांना पक्षाची भूमिका मीच मांडत असतो त्यामुळे संबंध महाराष्ट्रातील सामान्य नागरिकही मला ओळखतात. असेही त्यांनी ठणकावून सांगितले. राज्यामध्ये शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडण्याची मोहीम राबवली जात आहे, हे योग्य नाही शेतकऱ्यांनी बिल भरली पाहिजेत या मताशी मी सहमत आहेच परंतु त्यांना भरण्यासाठी काही ठरावीक दहा दिवसांची मुदत द्या आणि शेतकऱ्यांच्या दोन तरी बिल भरावी अशी वीज मंडळाची अपेक्षा आहे ती भरावी असेही आवाहन शेतकऱ्यांना यावेळी पाटील यांनी केले. पंडित देशमुख खून प्रकरणाची फाईल ओपन करण्यासाठी आम्ही कोर्टाशी पत्रव्यवहार करणार आहोत. मागील १७ वर्षापासून ही फाईल बोर्डावर आली नाही. इतर केसचा निकाल लवकर लागतो परंतु या केसमध्ये असे काय आणि कशामुळे घडले की ती फाईल बोर्डवर आली नाही हे बघण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार असल्यासही यावेळी उमेश पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी लोकनेतेचे माजी व्हाईस चेअरमन मानाजी माने, मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव रमेश बारसकर, राहुल क्षीरसागर शिवसेनेचे मोहोळ शहर प्रमुख विक्रम ऊर्फ विकी देशमुख, ज्येष्ठ नेते पद्माकर देशमुख, प्रसन्न पाटील , संजय विभुते बाबासाहेब मोटे, शामराव जवंजाळ अजिंक्य क्षीरसागर, सचिन चव्हाण, अण्णासाहेब पाटील, सागर जाधव आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.



## काठीने मारून खुनाचा प्रयत्न; एकावर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर : शिवीगाळ करताना भांडण सोडवल्याचा राग धरून काठीने डोक्यात मारून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना सरकोली (ता. पंढरपूर) येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

कुलभूषण हावळे (रा. सरकोली) असे गंभीर जखमी झालेल्या इसमाचे नाव आहे. त्यांना बेशुध्द अवस्थेत खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या वतीने सुधीर अशोक भालेराव यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सचिन सुखदेव भालेराव (रा. सरकोली) याच्या विरुध्द खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. शनिवारी दुपारच्या सुमारास कुलभूषण आवळे आणि अन्य दोघेजण सुधीर भालेराव यांच्या घरात बसले होते. त्यावेळी आरोपी सचिन हा तेथे येऊन शिवीगाळ करीत होता. तेव्हा कुलभूषण यांनी त्यांना शिवीगाळ करू नको म्हणून भांडण सोडवले होते. त्याचा राग धरून रात्रीच्या सुमारास त्याने काठीने हल्ला केला. अशी नोंद पोलिसात झाली.

# बाजवा चालले, पण...

पाकिस्तानातील इम्रान खान यांची सत्ता विरोधकांनी उलथवून टाकल्यानंतर त्या देशात सर्वकाही आलबेल आहे, असे म्हणताच येणार नाही. राजकीय अस्थिरता तर आहेच शिवाय जनता महागाई व गरिबीने होरपळत आहे. दहशतवाद सुरूच असून ठिकठिकाणी हल्लेही होत आहेत. एका रॅलीत खान यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर तरुणवर्गही कुठल्या थराला गेला आहे हे जगाला कळून आले.सत्तेत असताना खान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रशंसा केली तसेच खानमहाशय हे जेंव्हा आखाती देशांमध्ये मदत मागायला गेले तेव्हा भारताशी पुन्हा मैत्री जुळवून घ्यावी, असा सल्ला तिथल्या सत्ताधीशांकडून दिला गेला. खान यांच्यात बऱ्यापैकी परिवर्तन होत चालले होते परंतु तिथल्या लष्करशाहीला ते मान्य नव्हते. तिथल्या लष्करप्रमुखांनी भारताचा सतत द्वेष केला आहे. आपल्या देशाचे पाकिस्तानचे वाट्टोळे झाले तरी चालेल भारताशी सलोखा करायचाच नाही. एका बैठकीत खान यांनी भारताच्या मैत्रीचा प्रस्ताव ठेवल्यानंतर विद्यमान लष्करप्रमुख कमर जावेद बाजवा हे खान यांच्या अंगावर धावून गेल्याची बातमी फुटली होती. या प्रसंगावरून एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे लष्करप्रमुखाला भारताशी मैत्री बिलकूल नको आहे. आता बाजवा हेही पायउतार होणार आहेत. त्यांच्या जागी नवा चेहरा कुणाचा असेल त्याबद्दल भारतीय उपखंडात उत्सुकता आहे. पाकिस्तानात लष्करप्रमुखांचे



विशेष महत्त्व आहे. मागील ७५ वर्षांमध्ये जवळपास तीन दशके पाकिस्तानवर लष्कराची सत्ता राहिलीय. या काळात लष्कराने भारताविरोधात तीन युद्धे लढली. पाकिस्तानमध्ये सरकार अस्तित्वात असले तरी येथील निर्णयप्रक्रियेमध्ये लष्करप्रमुखांचा बराच हस्तक्षेप असतो. लष्करप्रमुख प्रामुख्याने सुरक्षा आणि परराष्ट्रविषयक धोरणांमध्ये हस्तक्षेप करतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अद्याप ताणलेलेच आहेत. याच कारणामुळे पाकिस्तानचे नवे लष्करप्रमुख कोण असतील तसेच त्यांचा भरत तसेच अन्य देशांप्रति दृष्टिकोन कसा असेल याला फार महत्त्व आले आहे. जनरल बाजवा यांची २०१६ साली पाकिस्तानच्या लष्करप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. पाकिस्तानसाठी आर्थिक मदत उभारण्यासाठी त्यांनी चीनसह मध्य पूर्वेतील देशांनी भेट दिलेली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून पाकिस्तानसाठी भांडवल उभे करण्यासाठी त्यांनी अमेरिकेशी चर्चादेखील केलेली आहे. तसेच लष्करप्रमुखपदी असताना बाजवा यांनी पाकिस्तानमधील उद्योगपतींची आपल्या कार्यालयात बैठक बोलावली होती. त्यात त्यांनी उद्योगपतींना अधिक कर भरण्यास प्रोत्साहित केले होते. बाजवा यांच्या कार्यकाळातच २०१९ साली भारत-पाकिस्तान यांच्यातील संबंध आणखी बिघडले होते. याच वर्षात भारताने पाकिस्तानवर हवाई हल्ला केला होता. मात्र, बाजवा यांनी त्यावेळी वाद टाळण्यास प्राधान्य दिले होते. बाजवा यांच्यावरही राजकीय हस्तक्षेपाचा आरोप करण्यात आलेला आहे. खान यांना पंतप्रधान म्हणून निवडून येण्यास बाजवा यांनी मदत केली, असा आरोप राजकीय नेते करतात. तर माझ्या राजकीय अध:पतनासाठी बाजवा यांनी भूमिका बजावली, असा आरोप खान यांनी याच वर्षी केला होता. पाकिस्तानी लष्करप्रमुखाची निवड करण्यासाठी प्रक्रिया असते. यामध्ये मावळते लष्करप्रमुख लष्करामधील सर्वात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याचे नाव पंतप्रधानांकडे सोपवतात. लष्करामध्ये सर्वात वरिष्ठ असलेल्या चार अधिकाऱ्यांपैकीच एकाची लष्करप्रमुख म्हणून निवड केली जाते. पाकिस्तानी लष्करप्रमुखाचा कार्यकाळ हा तीन वर्षांचा असतो. मात्र, अनेक वेळा ही मुदत वाढवली जाते. याच कारणामुळे पाकिस्तानमधील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता बाजवा यांनादेखील मुदतवाढ मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पाकिस्तानमधील एकूण ३० पंतप्रधानांपैकी १९ पंतप्रधान आपला ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकलेले नाहीत. काही सत्ताधीशांची सत्ता लष्करप्रमुखांनी उलथवून टाकली आहे. परवेज मुशर्रफ यांचे हे कारस्थान सर्वश्रुत आहे.बाजवा यांना मुदतवाढ दिली काय किंवा नवा कुणी आला तरी भारताशी जुळवून घेण्याची त्यांची तयारी नसतेच. लष्करप्रमुख येत्या काळातही असेच वागले तर पाकचे अध:पतन व्हायला लागेल.

## व्यापारजगत

# व्यापारी तुटीने अर्थव्यवस्थेला ब्रेक लागणार?

> महागाई (Inflation), बेरोजगारी (Unemployment), रुपयाचे अवमूल्यन आणि कदाचित येणारे मोठे संकट म्हणजे मंदी. यासगळ्यात आणखी एक मोठी समस्या भारतासमोर उभी राहिली आहे. ती म्हणजे भारताच्या चालू खात्यातील तुटीची. कारण एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत निर्यात २० महिन्यांच्या नीचांकी पातळीवर गेल्याने ऑक्टोबरमध्ये भारताची व्यापार तूट वाढली आणि फक्त वाढलीच नाही तर ही तूट एका वर्षापूर्वीच्या तुलनेत दुप्पट झाली, ज्यामुळे चालू खात्यातील तूट (CAD) वाढल्याबद्दल चिंता निर्माण झाली. याचे कारण काय आहे आणि त्याचे परिणाम काय होऊ शकतात, शिवाय सरकारने यासाठी काय करायला हवे हे आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करुया...

सर्वप्रथम चालू खात्यातील तूट म्हणजे काय? तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार, चालू खात्यातील शिल्लक वस्तू आणि सेवांच्या निर्यातीचे मूल्य आणि वस्तू आणि सेवांच्या आयातीचे मूल्य यांच्यातील फरक दाखवते त्याला तूट म्हणतात. ही तूट म्हणजे, भारत निर्यातीपेक्षा जास्त वस्तू आणि सेवा आयात करतो आहे. ज्यात चालू खात्यातील निव्वळ उत्पन्न म्हणजे, व्याज आणि लाभांश, त्याचप्रमाणे परदेशी मदत जी सहसा एकूण रकमेचा एक छोटासा भाग असते, अशी अर्थशास्त्रीय व्याख्या याची करता येईल.

चालू खात्यातील तूट हे देशाच्या व्यापाराचे मोजमाप आहे. चालू खात्यातील तूट समजून घेणे, कारण एखादा देश आयातीच्या मूल्याच्या तुलनेत त्याच्या निर्यातीचे मूल्य वाढवून त्याचे विद्यमान कर्ज कमी करू शकतो. ते आयातीवर निर्बंध घालू शकते, जसे की टॅरिफ किंवा कोटा, किंवा ते निर्यातीला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांवर भर देऊ शकतो, जसे की आयात प्रतिस्थापन, औद्योगिकीकरण किंवा देशांतर्गत कंपन्यांची जागतिक स्पर्धात्मकता सुधारणारी धोरणे. देश देशांतर्गत चलनाचे मूल्यांकन अवमूल्यनाद्वारे इतर चलनांच्या तुलनेत सुधारण्यासाठी मौद्रिक धोरण देखील वापरू शकतो, ज्यामुळे देशाचा निर्यात खर्च कमी होतो. याशिवाय विद्यमान तूटीचा असा अर्थ लावू शकतो की, एखादा देश त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त खर्च करत आहे, चालू खात्यातील तूट असणे स्वाभाविकपणे गैरसोयीचे नाही. जर एखाद्या देशाने कर्जावरील व्याजदरापेक्षा जास्त परतावा देणाऱ्या गुंतवणुकीसाठी बाह्य कर्जाचा वापर केला तर चालू खात्यातील तूट चालू असताना देश दिवाळखोर राहू शकतो. जर एखाद्या देशाला भविष्यातील महसूल प्रवाहासह वर्तमान कर्ज पातळी कव्हर करण्याची शक्यता नसेल, तो दिवाळखोर होऊ शकतो.

भारत सामान्यत: चालू खात्यातील तूट चालवतो. कारण भारताची अर्थव्यवस्था एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे, जी कच्चं तेल यासारख्या अनेक वस्तूंच्या आयातीवर अवलंबून असते. पण यामधली मुख्य आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, चालू खात्यातील तूट ही वाईट गोष्ट नाही, असे जाणकार सांगतात.

भारतासाठी सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे २.५-ते-३ टक्के चालू खात्यातील तूट शाश्वत असल्याचे म्हटले जाते. या रेषेच्या पलीकडे असलेली तूट ही मात्र चिंतेचे कारण आहे. कारण आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये देशाने चालू खात्यावरील अधिशेष पाहिला तर आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ पण पुन्हा तुटीत गेले. या आर्थिक वर्षात चालू खात्यातील तूट जीडीपीच्या ३.३ ते ३.९ टक्के राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सप्टेंबरमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सांगितले की तूट जीडीपीच्या ३ टक्क्यांच्या आत राहण्याची अपेक्षा आहे, पण हे कठीण होऊ शकते. कारण जागतिक मंदीमुळे निर्यात आणखी कमी होऊ शकते.



भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि भारताची बाजारपेठ एक मजबूत आणि अधिक लवचिक औपचारिक क्षेत्र ठरत आहे. कोरोना व्हायरस आणि रशियाचे युक्रेनवरील आक्रमण यासारख्या अलीकडील संकटांचे परिणाम व्यवस्थापित करण्यासाठी धोरणकर्ते सक्रिय आहेत. कारण देशाचे बाह्य धक्क्यांपासून रक्षण करतील असा विश्वास आपल्याला ठेवायला लागेल. विकसित आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील तूट ही चालू खात्यातील तूट परदेशात नकारात्मक निव्वळ विक्री दर्शवते. युनायटेड स्टेट्ससारखे विकसित देश अनेकदा तूट चालवतात तर उदयोन्मुख अर्थव्यवस्था अनेकदा चालू खाते अधिशेष चालवतात. गरीब देश चालू खाते कर्ज चालवतात.

चालू खात्यातील तुटीचे वास्तविक उदाहरण म्हणजे देशाच्या चालू खात्यातील चढ-उतार मुख्यत्वे बाजारातील शक्तींवर अवलंबून असतात. जे देश हेतुपुरस्सर तूट चालवतात त्यांच्याही तुटीत अस्थिरता असते. उदाहरणार्थ, युनायटेड किंग्डमने २०१६ मध्ये ब्रेक्झिट मतदानाच्या निकालानंतर विद्यमान तूट कमी केली.

युनायटेड किंग्डम पारंपारिकपणे तूट चालवतो. कारण हा एक देश आहे जो जास्त आयातीसाठी वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च पातळीचे कर्ज वापरतो. देशाच्या निर्यातीचा मोठा भाग वस्तूंचा आहे आणि वस्तूंच्या किमती घसरल्याने देशांतर्गत कंपन्यांचे उत्पन्न कमी झाले आहे. ही कपात युनायटेड किंगडममध्ये परत येणाऱ्या कमी उत्पन्नात अनुवादित होते, ज्यामुळे चालू खात्यातील तूट वाढते. तर २३ जून २०१६ रोजी झालेल्या ब्रेक्झिट मतदानाचा परिणाम ब्रिटीश पौंडचे मूल्य घसरल्यानंतर जाणवला, कमकुवत पाउंडने देशाचे विद्यमान कर्ज कमी केले. ही घट झाली कारण देशांतर्गत कमोडिटी कंपन्यांसाठी परदेशातील डॉलरची कमाई जास्त होती, परिणामी देशात रोखीचा ओघ अधिक होता.

दरम्यान, आता भारताबद्दल बोलायचे झाल्यास, भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पुरेसा राखीव निधी आहे आणि देशांतर्गत चलनवाढ कमी करण्यासाठी व्याजदर वाढवत आहे. रुपयासाठी कोणत्याही विशिष्ट पातळीवर लक्ष्य न ठेवणारी आरबीआय विनिमय दरातील अस्थिरता रोखण्यासाठी डॉलरची विक्री करते आहे. तर जागतिक स्तरावर ग्रीनबॅकच्या वाढीमुळे चलनांना फटका बसला आहे. कारण फेडरल रिझर्व्ह आर्थिक धोरण कडक करण्यासाठी आक्रमक आहे. भारताचे आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी १२ नोव्हेंबर रोजी रुपयावरील दबाव कमी करण्यासाठी मध्यवर्ती बँकेच्या हस्तक्षेपाचा बचाव करत अशा परिस्थितीत परकीय चलन गंगाजळीचा वापर करणे आवश्यक आहे असल्याचे म्हटले आहे.


चार नोव्हेंबर रोजी भारताचा परकीय चलनसाठा ५३० अब्ज डॉलर होता, जो गेल्या वर्षीच्या याच वेळेपेक्षा १११ अब्ज डॉलरने कमी होता. भारत पैशाच्या इनफ्लो आणि आऊटफ्लोसाठी तयार असल्याचे दास म्हणाले. अल्पकालीन आणि दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी भारत हे गुंतवणुकीचे आकर्षक ठिकाण आहे. आगामी अर्थसंकल्पात देशांतर्गत उद्योगाला आणखी चालना मिळेल आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी पावले उचलण्याची अपेक्षा आहे.

**- दीपक पळसुले.**

## टुडेज ब्लॉग

# निवड समिती गो आऊट

टीम इंडियाच्या टी-ट्वेन्टी वर्ल्डकपमधील सेमी फायनलच्या मानहानीकारक पराभवाला बीसीसीआयने अत्यंत गांभीर्याने घेतलेय. चेतन शर्मांच्या नेतृत्वाखालील अख्खी निवड समिती बदलण्याचा निर्णय आता बीसीसीआयने घेतलाय. या स्पर्धेत टीम इंडियाचा मुकाबला पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड या तीन तगड्या संघांशी झाला होता. यापैकी पाकविरुद्धची लढत कशीबशी जिंकली होती तर दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्ध भारताला दोन मोठ्या पराभवांना सामोरे जावे लागले होते. यातील सेमी फायनलचा पराभव इतका जिव्हारी लागणारा होता की, इंग्लिश सलामीवीरांची जोडीही भारत फोडू शकला नव्हता. बटलरच्या टीमने चार ओव्हर्स आणि दहा विकेट्स राखत भारताला धूळ चारली तर अन्य सामन्यातील भारतीय कामगिरीचा विचार केल्यास बांगलादेशविरुद्धच्या लढाईत जिंकतानाही आपल्याला घाम फुटला होता. नेदरलँड्स आणि झिम्बाब्वे हे दोनच सामने आपण त्यातल्या त्यात कम्फर्टेबली जिंकलो होतो. पण या दोघांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील ताकद ही भारताच्या तुलनेत अगदीच नगण्य आहे. याउलट टी-ट्वेन्टी सांघिक क्रमवारीत टीम इंडिया अव्वल स्थानी आहे. त्यामुळे या लौकिकाला अव्वल संघांविरुद्धची कामगिरी नक्कीच साजेशी नाही. टी-ट्वेन्टी हा तरुण रक्ताचा, सळसळत्या तारुण्याचा आणि अव्वल फिटनेसचा खेळ आहे. अशा खेळात आपल्या संघातील काही खेळाडूंचे वय, फिटनेस यावरुन चर्चा सुरु झाल्या असतानाच आता बीसीसीआयने हे कठोर पाऊल उचललेय.



क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅट्समध्ये आता आपल्याकडे वेगळे संघ आणि वेगळा कॅप्टन असावा, अशी चर्चा जोरात सुरु आहे. काही देशांनी याआधीच तिन्ही फॉरमॅट्सकरता ही तरतूद करुन ठेवलीय. इंग्लंडचेच उदाहरण घेऊया. त्यांनी मॉर्गन, स्टोक्स आणि बटलर अशा निरनिराळ्या खेळाडूंना कर्णधार म्हणून नियुक्त करत त्या-त्या फॉरमॅटची तयारी उत्तम केली. आपण, कोहलीसह तिन्ही फॉरमॅट्समध्ये खेळणं आधी प्रिफर केले होते. कोहलीने कॅप्टन्सी सोडल्यावर आपण रोहित, राहुल असे पर्याय चाचपले. आता प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिल्यावर आपण किवी दौऱ्यासाठी हार्दिक पंड्याकडे संघाचं सुकाणू दिलंय. खरं तर ही फक्त तात्पुरती अरेंजमेंट म्हणून न करता भारतीय क्रिकेटच्या म्हणजे टी-ट्वेन्टी क्रिकेटच्या भविष्यासाठी ही गुंतवणूक ठरावी, असं असलं तरीही भारताचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनी मात्र सावध पावलं टाकण्याचाच सल्ला दिलाय. भारताच्या सेमी फायनलमधील पराभवानंतर ते म्हणतात, संघात मोठ्या प्रमाणात बदल करुन काहीच साध्य होणार नाही. आपल्याकडे एखाद्या सामन्यात पराभूत झाल्यानंतर संघावर वाट्टेल तसे ताशेरे मारण्याची प्रथाच पडलीय. हा योग्य मार्ग नव्हे. निवड समितीला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील, हे मान्य आहे. असे असले तरीही याकरता आपल्याला काही वेळ द्यावाच लागेल. माझी खात्री आहे की निवड समिती योग्य ती पावले उचलेल.

एकाच पराभवाने सारे काही संपले, असे मानण्याची गरज नसली तरीही पुढच्या टी-ट्वेन्टी वर्ल्डकपसाठी संघबांधणीची हीच खरी वेळ आहे. हार्दिक पंड्याला जर आपण दीर्घकालीन टी-ट्वेन्टी कॅप्टन म्हणून पाहत असू. तर त्याच्या हातात असा ग्रुप ऑफ प्लेअर्स द्यायला हवा, जो आपल्याला पुढची किमान पाच वर्षे या फॉरमॅटमध्ये उत्तम रिझल्ट देईल. याची सुरुवात बीसीसीआयने निवड समितीपासून केलीय. आता नव्याने निवड समिती निवडल्यानंतर ती कशी परफॉर्म करते हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**- अश्विन बापट.**

## बोधकथा

# कोंबडी आणि कोल्हा



एक कोल्हा एका खोपटात शिरून काही तरी खायला मिळविण्याच्या शोधात असता एक कोंबडी त्याच्या दृष्टीस पडली. पण ती उंच माळ्यावर बसली होती. यामुळे तिच्याजवळ त्याला जाता येईना. मग तिला युक्तीने खाली आणून मारून खावी या हेतूने कोल्हा तिला म्हणाला, 'कोंबडीताई तुझी हाल हवाल कशी आहे? तू बरेच दिवस आजारी असून घरातच निजून असतेस असे समजले.

तेंव्हापासून तुझ्या काळजीने मला झोप येईना. खरंच ताई, आता तू बरी आहेस का? थोडा वेळ खाली उतर म्हणजे मी तुझी नाडी तरी पाहीन.' याप्रमाणे अघळपघळ बोलून कोल्हा तिची स्तुती करीत असता कोंबडी बसल्या जागेवरूनच म्हणाली, 'खरंच भाऊ, तू जी बातमी ऐकली ती अगदी खरी आहे. असा आजार मला कधीही झाला नव्हता. मी आता खाली उतरून तुझ्याकडे आले असते, पण वैद्याने मला अगदी बजावून सांगितले आहे की, तू आपली जागा सोडून कुठेही जाऊ नकोस. कारण अशक्तपणामुळे जागेवरून हालण्याचे श्रम माझ्याने सोसणार नाहीत आणि म्हणून माझ्याने खाली येववत नाही. तरी आता तू यावेळी जा. सध्या मी इतकी अशक्त आहे की जर मी उतरून खाली असते तर माझे प्राणच जातील.' **तात्पर्य :- वाजवीपेक्षा अधिक अगत्य दाखवून एखादा माणूस दुसऱ्याची विनाकारण प्रशंसा करू लागला की, त्या माणसाला काहीतरी स्वार्थ साधावयाचा आहे, असे समजून त्याच्याविषयी शक्य तितकी सावधगिरी ठेवावी.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ३



त्याप्रमाणे जीवात्मा वृद्धावस्थेतील जीर्णशीर्ण शरीराचा त्याग करुन नवा देह धारण करतो आणि नवजात शिशूच्या रुपाने पुन्हा इहलोकात येतो. अंगावरच्या वस्त्राचे जेवढे महत्व तेवढेच शरीराचे. अंगावरची वस्त्रे म्हणजे मीच, असे म्हणणाऱ्याला आपण वेडा समजून हसतो तसेच शरीरात नांदणाऱ्या आत्म्याला न जाणता 'देह म्हणजे मीच आहे' असे म्हणणाऱ्या जीवात्म्याला, संत अज्ञानी समजतात.

सत्य प्राप्त करुन घेण्यासाठी जीवात्मा भूतलावर आला. परंतु त्याने या सुवर्णपात्रावरचे झाकण उघडून आत बघितलेच नाही. त्या पात्रासोबतच खेळ खेळत तो आपले आयुष्य घालवतो. सत्याची प्राप्ती सहज होत नाही. 'नायमात्मा प्रवचनेन लभ्य: नायमात्मा बलहीनेन लभ्य: ।'

शास्त्र सांगते की, आत्मा दुर्बळांना प्राप्त होत नाही. येथे अत्यंत शक्तिशाली माणसाची आवश्यकता असते. अर्थात् मनोनिग्रहाची गरज असते. ज्याचे मन अत्यंत चंचल आहे, त्याला कदापी आत्मज्ञान होत नाही. म्हणून सत्य अत्यंत महत्वाचे मानले जाते. तुम्ही ऐकले आहे की, सत्याच्या प्राप्तीसाठी सत्य बोलावेच लागते. जोपर्यंत सत्य बोलण्याचा अभ्यास होत नाही तोपर्यंत सत्यस्वरुप अशा भगवंताच्या नावाचा अखंड जप केला पाहिजे. जेंव्हा तुमच्या जिव्हेवर सत्य प्रतिष्ठित होईल, तेंव्हा तुमची जिव्हा कधी असत्य बोलणार नाही आणि सत्य बोलता बोलता तुम्हांला सत्याची प्राप्ती होईल. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# ऊस वाहतुकीला शिस्त लावा

उसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकून तीन तरुण मुलांचा करुण अंत झाल्याची दुर्दैवी घटना दौंड तालुक्यात नुकतीच घडली. काष्टी तालुका श्रीगोंदा येथे राहणाऱ्या या पंचवीशीच्या आतील तीन तरुणांची दुचाकी रिफ्लेक्टर नसलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकल्याने हा अपघात घडला. अर्थात उसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकून झालेला हा पहिला अपघात नाही याआधीही असे अनेक अपघात झाले आहेत व त्या अपघातात काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे तरीही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही.

सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्याचा गाळप हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे ऊसतोड करून ऊसाची वाहतूक जोमात सुरू आहे. मात्र, त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनाचा पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत.

**- श्याम ठाणेदार, दौंड, पुणे.**

# 'लव्ह जिहाद'ने केली कत्तल

सोशल मीडियावरून मकरंद मुळे यांची कविता गाजते आहे, त्या कवितेत लव्ह जिहादच्या जाळ्यात हिंदू मुली कशा सहज फसतात, मोहात सापडतात, अगतिक होतात आणि शेवटी कशा उद्ध्वस्त होतात, हे मांडले आहे.

हो, मला आवडतं,
जिहाद समजून न घेता पळून जायला...
हो मला आवडतं,
त्याच्यासोबत पळून जायला,
मारहाण करून घ्यायला,
त्याच्याकडून तुकडे करून घ्यायला,
जाळून घ्यायला,
गुपचूप निकाह उरकायला,
हिजाब घालायला,
आणि त्याची दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी बेगम व्हायला...


मुंबईतील मालाड येथील कॉल सेंटरमध्ये नोकरी करणाऱ्या, वसईला राहणाऱ्या आणि विरारच्या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या श्रद्धा विकास वालकर या मुलीला आफताब अमिन पूनावाला या तरुणाने नादी लावले, मोहात ओढले, लिव्ह इन रिलेशनमध्ये राहण्यास उद्युक्त केले आणि त्याची गरज संपली तेव्हा दिल्लीला नेऊन तिचा गळा दाबून हत्या केली आणि तिच्या शरीराचे पस्तीस तुकडे करून जंगलात फेकून दिले. लव्ह जिहादचा शेवट कसा क्रूर व भयानक असतो त्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. आफताबच्या प्रेमात श्रद्धा पागल झाली होती, त्याने तिच्यावर जादू केली होती, मी निर्णय घ्यायला स्वतंत्र आहे, मी त्याच्याबरोबर जाणार असे वडिलांना सांगण्यापर्यंत तिची मजल गेली होती. आफताब हा दिल्ली पोलिसांपुढे खोटे बोलून त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. पोलिसांना तो चुकीची माहिती देत असल्याने श्रद्धाच्या हत्येचे पुरावे जमा करणे हे पोलिसांपुढे फार मोठे आव्हान आहे.

वसईचे पोलीसही चक्रावून गेलेत, त्यांनी जेव्हा आफताबला चौकशीसाठी बोलावले तेव्हा किंचितही संशय येऊ नये अशी त्याने दक्षता घेतली. श्रद्धाचा खुनी असूनही आपण निष्पाप आहोत, ती अगोदरच आपल्याला सोडून निघून गेली होती असा तो आव आणत आहे. श्रद्धाच्या हत्याकांडाचे पुरावे मुंबईपासून दिल्लीपर्यंत जमा करणे व त्याची सुसंगत मांडणी करणे यासाठी पोलिसांना फार मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. आफताबने छत्तरपूरमधील ज्या फ्लॅटवर श्रद्धाची गळा दाबून हत्या केली, त्या घरात सहा महिन्यांनतर रक्ताचा ठिपका सापडणार कसा? खून केल्यानंतर कोणताही पुरावा शिल्लक राहू नये, याची दक्षता आफताबने घेतली. आफताबने रसायनांचा वापर करून त्या फ्लॅटची स्वच्छता केली. आफताबने पोलिसांसमोर कबुली दिली की, श्रद्धाच्या शरीराचे पस्तीस तुकडे करायला त्याला दहा तास लागले. सर्व तुकडे पाण्याखाली त्याने तासभर धुतले. तुकडे करताना त्याने बाथरूममधील शॉवर चालू ठेवला होता. नंतर पॉलिथिनच्या १८ बॅगांमध्ये भरून ते फ्रीजमध्ये ठेवले. त्यानंतर ऑनलाइन जेवण मागवले, बिअर घेतली, जेवला, वेबसीरिज पाहिली व तेथेच राहिला. श्रद्धाची हत्या झाल्यावर त्याने त्याच्या काही मैत्रिणींनाही याच फ्लॅटवर आणले होते. तेथे त्याने कोणाकोणाला रोमान्स करण्यासाठी आणले? त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

श्रद्धाच्या हत्येनंतर त्याने आपला जुना मोबाइल 'ओएलएक्स'वर विकून टाकला. श्रद्धाचा मोबाइल कुठे आहे, तो नेमके सांगत नाही, आपण मुंबईजवळ फेकून दिला, असे म्हणतो.

श्रद्धाची हत्या १८ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास झाली. पण तिचा मोबाइल फोन २६ मेपर्यंत चालू होता. दरम्यानच्या काळात आफताबने तिच्या बँक अकाऊंटवरून ५४ हजार रुपये ट्रान्सफर केले. श्रद्धाचा मोबाइल बंद झाला, तेव्हा त्याचे शेवटचे ठिकाण हे दिल्ली होते. तिथूनच श्रद्धाच्या हत्येचे धागे-दोरे उलगडायला सुरुवात झाली. श्रद्धाची हत्या करून तिच्या शरीराचे तुकडे करून आफताब फ्रीजमध्ये ठेवतो आणि एका तरुणीला फ्लॅटवर मौज-मजा करण्यासाठी आणतो, एवढी क्रूर मानसिकता त्याची कशी तयार झाली? अन्य मुलींशी संबंध हे श्रद्धाच्या हत्येचे कारण असू शकते का? पोलिसांना जंगलात शरीराचे अवयव सापडलेत ते श्रद्धाचेच आहेत का? श्रद्धा व आफताब हे ८ मे रोजी दिल्लीला गेले व अवघ्या दहा दिवसात म्हणजे १८ मे रोजी तिची हत्या झाली, हे सर्व नियोजनबद्ध वाटते. छत्तरपूरला जंगलाजवळ भाड्याचे घर घेणे हासुद्धा हत्येच्या कटाचा भाग असू शकतो. 'येस, आय किल्ड हर', अशी कबुली आफताबने पोलिसांपुढे दिली आहे.

आफताब व श्रद्धा हे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये २०१९ पासून होते. लिव्ह इन रिलेशन



असा कायदा झालेला नाही, पण सर्वोच्च न्यायालयाने वयाने सज्ञान असलेल्या अविवाहित स्त्री-पुरुषांना असे राहण्याची परवानगी दिलेली आहे. श्रद्धाने आफताबकडे लग्नाचा तगादा लावला म्हणून त्या दोघांमध्ये वारंवार भांडणे होत असत. तो तिला मारहाण करीत असे. सिगारेटचे चटके देत असे. तसे तिने आईलाही सांगितले होते. पण ती आफताबला सोडून आई-वडिलांकडे परतली नाही किंवा तशी तिला संधीही मिळाली नसावी. तिची हत्या झाली तेव्हा कोणी साक्षीदार नव्हता. हत्येनंतर तिचा मृतदेह मिळालेला नाही. जंगलात मिळालेले शरीराचे तुकडे हे तिचेच आहेत, हे पोलिसांना सिद्ध करावे लागतील. आफताबच्या सांगण्यावर विश्वास न ठेवता पोलिसांना सखोल तपास करावा लागेल. केमिकल्सच्या सहाय्याने रक्ताचे नमुने किंवा तिच्या केसाचे तुकडे पुरावे म्हणून सापडू शकतात का? हे पोलिसांना मोठे आव्हान आहे.

आफताबने श्रद्धाची हत्या अत्यंत थंड डोक्याने केली आहे. यापुढे दुसरी श्रद्धा अशा जाळ्यात फसू नये म्हणून तरुण मुलींनी सावध राहणे गरजेचे आहे. आफताब व श्रद्धा प्रकरणात तो शिकारी राहिला व त्याने श्रद्धाला सावज म्हणून टिपले. शिकारी तिकडचा व सावज इकडचे अशीच उदाहरणे कायम दिसत असतात. याचे कारण काय? ऑनलाइन डेटिंगमधून लिव्ह इन रिलेशनपर्यंत वाहत गेल्यावर शेवट काय होतो, हे श्रद्धाच्या क्रूर हत्येने दाखवून दिले आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# राज्यपाल कोश्यारींचा सोलापुरात निषेध

## ठाकरे गटाचे जोडो मार आंदोलन

## राष्ट्रवादीच्यावतीने महाराजांचा दुग्धाभिषेक

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केल्याचे पडसाद सोलापुरात उमटले आहे. सोलापूरात राज्यपाल कोश्यारी यांचा निषेध केला जात आहे शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने कोश्यारी यांच्या प्रतिमेस जोडो मार आंदोलन करत निषेध केला तर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा दुग्धाभिषेक करत राज्यपाल यांचा निषेध केला. मराठा समाजाने देखिल निषेध केला.

राज्यपाल आणि भाजपचे प्रवक्ते सुरेंद्र तिवाडी यांनीद देखिल छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अवमान केला आहे. यांचे पडसाद राज्यात उमटले आहेत. राज्यपाल यांच्यासह तिवाडी यांचा निषेध केला जात आहे. राज्यपाल कोश्यारी यांनी यापुर्वी सुध्द छत्रपती शिवाजी महाराजाचा अवामन केला होता. त्यानंतर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या बाबत देखिल बेताल वक्तव्य केले होते. छत्रपती शिवाजी महाराजाची तुलना भाजप नेत्यांची केल्याने शिवप्रेमीच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. कोश्यारी यांचा राज्यभर निषेध केला जात आहे. सोलापूरात देखिल यांचे पडसाद उमटले आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात कोश्यारी यांच्या प्रतिमेस काळे फासत जोडो मारण्यात आले राज्यपाल कोश्यारी यांची राज्यातून तात्काळ हकालपट्टी करावी अशी मागणी केली जात आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या आंदोलनाच्या वेळी घोषणाबाजी करत कोश्यारी यांचा निषेध केला तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ केंद्रशासनाची चर्चा करून कोश्यारी यांना परत पाठवावे अन्यथा सोलापूर जिल्हात भाजपच्या मंत्र्यांना आणि नेत्यांना फिरकू देणार नाही असा इशारा दिला आहे. या आंदोलनात जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे, शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, दत्तात्रय वानकर, प्रताप चव्हाण, सुरेश जगताप, लहू गायकवाड, संदीप बेळमकर, विजय पुकाळे, रेवण बुक्कानवरे, अनिल कोंडूर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



राज्यपाल यांनी आता पर्यंत अनेक महापुरूषांचा अवमान केला आहे. भाजपचे पार्सल महाराष्ट्रात नको आहे शिंदे फडणवीस सकराने या आंदोलनाची दखल घेऊन राज्यपाल कोश्यारी यांना परत पाठवावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाप्रमुख बरडे यांनी दिलास आहे तर त्यांचे धोतर फेडणाऱ्यास दिड लाखाचे बक्षीस देण्याची घोषणा बरडे यांनी केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याबद्दल I निषेध करण्यात आला, छत्रपती शिवाजी महाराज चौकात येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा दुग्धाभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अंदाधुंद वक्तव्य करण्याचा विकार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना झाला आहे, त्यामुळें महाराष्ट्रात सामजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न होत आहे बेताल वक्तव्य करणाऱ्या कोश्यारी यांची महाराष्ट्र राज्यपाल पदावरून हकालपट्टी करावी अशी मागनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. यावेळी प्रंशात बाबर, ज्योतिबा गुंड, निशांत सावळे, संपन्न दिवाकर, रुपेश भोसले, अक्षय जाधव, मुसा अतार, बिरप्पा बंडगर, मयूर रचा, संदीप साळुंखे, श्रवण ढवलगे, सचिन चलवादी, लखन गावडे, महेश कुलकर्णी, गणेश छत्रबंद, कुमार हलकट्टी, विशाल सावंत, यांची प्रमुख उपस्थिती होती.



## आदर्श ज्येष्ठ नागरीक मंडळाची वार्षिक सभा

✔ सुराज्य/सोलापूर : आदर्श ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा विश्वस्त अध्यक्ष विजयकुमार भोसले यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. प्रारंभी विश्वस्त सचिव संजय जोगीपेटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात विविध उपक्रमांची माहिती दिली. तर उपाध्यक्ष मलप्पा मुळजे यांनी सभेच्या कामकाजाची रूपरेषा विषद केली. विषयानुरूप चर्चा व विविध ठरावासह नूतन कार्यकारिणी गठित करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य पुढीलप्रमाणे : निमंत्रक - सिध्दप्पा गोविंदे, कार्यवाह - शिवाजीराव क्षीरसागर, कार्याध्यक्ष - दौलतराव भैरामडगी, संघटक - हनुमंतू गजेली, सहकार्यवाह - मल्लिकार्जुन गोरंटी समन्वयक - शाम गांगजी, यांच्यासह विश्वस्त मंडळ यांची पंधरा सदस्यीय कार्यकारिणी तसेच अरण्यऋषी मारुती चिट्टमपल्ली, बुरबुरे, कल्याणराव आळंद इ. तज्ञ मंडळींची सल्लागार समिती घोषित करण्यात आली. शेवटी समारोप तथा आभाराचे प्रदर्शन सिध्देश्वर श्रीगादी यांनी केले.




## अकलूज नगरपरिषदेचे लोकसहभागातून स्वच्छता अभियान

✔ सुराज्य/अकलूज : अकलूज नगरपरिषद मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज नगरपरिषद कर्मचारी यांचेकडून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सर्व कर्मचारी यांना माझी वसुंधरा शपथ देण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी दयानंद गोरे व सर्व नगर परिषद कर्मचारी सहभागी होते. स्वच्छ भारत अभियानात सातत्य राखणेच्या दृष्टींने संपुर्ण नागरी भारत कचरामुक्त करणेच्या दृष्टींने केंद्रशासनाच्या धोरणानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २. ० चा प्रारंभ करणेत आलेला आहे. सदर अभियान दि. २ ऑक्टोबर २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत राबविले जाणार आहे. या अभियाना मुख्य उद्देश कचरामुक्त शहरे हा आहे. शहर सौंदर्यीकरणाबरोबरच स्वच्छतेचे महत्व आहे. स्वच्छतेशिवाय शहराचे सौंदर्यीकरण अशक्य आहे. त्यामुळे शहरे स्वच्छ झाली तर सुंदर दिसतील या उद्देशाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णयान्वये शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२ आयोजित केली आहे. त्याअनुषंगाने अकलूज नगरपरिषदेच्यावतीने स्वच्छ सर्वेक्षण २०२३, माझी वसुंधरा अभियान ३. ० अंतर्गत नगर परिषद कर्मचारी यांच्या सहभागातून शहर सौंदर्यीकरण-स्वच्छता अभियानाचे आयोजन शनिवार, दि. १९ रोजी सकाळी %. ०० ते १०. ०० या वेळेत जयसिंह चौक ते संत गाडगे बाबा चौक, जयसिंह चौक ते कृषी उत्पन्न बाजार समिती याठिकाणी रस्तेसफाई श्रमदानामार्फत संपुर्ण परिसर स्वच्छ करणेत आला.

## कमळे गुरूजी जन्मशताब्दी वर्षानिमित्त ग्रंथ प्रदर्शन

✔ सुराज्य/सोलापूर : थोर गांधीवादी विचारवंत शिक्षणमहर्षी नाहि-याचे नेते म. गांधींच्या विचाराने भारावून



समाजातल्या शेवटच्या माणसासाठी सातत्याने झटणारे म. गाधी, विनोबा, पू. साने गुरूजींच्या वैचारिक वारसा जपणारे कै. दि.शि. कमळे गुरूजी होते. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्तसोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ व सुविधा प्रकाशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ' वाचन प्रेरणा व सप्ताह'' चे दि.२९ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर पर्यंत संस्था संचलित जीवन विकास प्रशाला भंडारकवठे, श्री. पंचाक्षरी विद्यामदीर विंचूर, जीवन ज्योत प्रशाला कंदलगाव, महात्मा फुले विद्यालय मंद्रुप, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय मंदरुप, यशंवत विद्यालय औराद, ग.रा. चितळे प्रशाला बरूर येथे आयोजित करण्यात आले असून पुस्तक प्रेमींनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे सचिव एम.डी. कमळे आणि सुविद्या प्रकाशनाचे बाबुराव मैदर्गीकर यांनी केली आहे.



## महात्मा बसवेश्वर मूर्तीची प्रतिष्ठापना

### भाग्यवंती देवीसह सवाद्य जलकुंभ मिरवणूक

✔ सुराज्य/सोलापूर

जुळे सोलापूर भागातील शिवबसव चौकातील बसवेश्वर हॉटेल समोर महात्मा बसवेश्वरांच्या लिंगपूजास्थित मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. सुवासिनींची जलकुंभासह पदयात्रा काढून सुवर्णरथातून बसवमूर्तीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ. बसवराज बगले यांच्या पुढाकारातून आणि बसवभक्त समाजसेवक चन्नबसवेश्वर गुरूभेटी यांच्या संकल्पनेतून जुळे सोलापूरच्या सैफुल भागात प्रथमच बसवेश्वरांची मूर्ती दर्शनासाठी उपलब्ध झाल्याने समाजातून आनंद व्यक्त होत आहे. शनिवारी दुपारी इंचगेरी मठातून जलकुंभ मिरवणुकीचा शुभारंभ झाला. इंचगेरी संप्रदायाचे माताजी पुष्पलता पाटील बसवतत्व प्रसारक सिंधुताई काडादी, सोलापूर बाजार समितीच्या माजी सभापती इंदुमती अलगोंडा पाटील, महाराष्ट्र वीरशैव सभा महिला आघाडीच्या शहर अध्यक्षा पुष्पाताई गुंगे यांच्या हस्ते बसवेश्वरांचे पूजन करून मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला.

बसवप्रेमी समाजसेवक सर्वश्री बसव अभ्यासक चन्नवीर भद्रेश्वरमठ, सचिन शिवशक्ती, अजिंक्य उप्पीन, विश्वनाथ आमणे, रूद्रप्पा पाटील, निंगोंडा तळे, शंकर कांबळे सर, भारत गुणापूरे सर, सिध्दाराम गुरूभेटी, श्रीशैल बगले, राजेश शिवशक्ती शिवानंद पाटील, सिध्दाराम, खुटेकर, शिवानंद बगले, शिवानंद होनराव, नागनाथ कांबळे, चंद्रकांत चोळके, नागेश कुंभार, मल्लिनाथ नागोजी, सुजाता चोळके, बुरकुल सर, बाजीराव बुळगुंडे, सुभाष बिराजदार, रावसाहेब साळुंखे, आनंद बिराजदार, प्रदीप जाधव, आदि उपस्थित होते. शिवबसव (सैफूल) चौकातील भाजी मार्केट जवळील बसवेश्वर हॉटेल समोरील टुमदार मंदिरात माजी आमदार शिवशरण पाटील आणि ए. जी पाटील शिक्षण समूहाचे प्रमुख सिध्दाराम पाटील यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. वे. संगय्या स्वामी आणि चन्नय्या स्वामी यांनी धार्मिक विधी आणि मंत्रपठण केले.

जलकुंभ मिरवणुकीतील सुवासिनींचा हळदी-कुंकू कार्यक्रम आणि बसव वचन पठणामुळे कार्यक्रमात वेगळा बहार आला होता. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विजय धनशेटटी, प्रकाश अंगडी, अश्विनी पांचाळ, रेखा अंगडी, रूपा धनशेटटी, पूजा आलुरे, आदिनी परिश्रम घेतले.




## दुचाकीच्या धडकेत एकजण गंभीर जखमी

✔ सुराज्य/सोलापूर : बाळे येथील पाटील ऑटोमोबाईल समोर दुचाकिवरून घरी जाताना एक जणाला धडक देऊन गंभीर जखमी केल्याची घटना दि. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी वरून संतोष मोठे (वय-२२, रा. जय मल्हार नगर, बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून संदीप महादेव पैकेकरी (रा. पद्मावती नगर, बाळे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे वडील संतोष दत्तोबा मोठे हे त्यांच्या दुचाकीवरून घरी येत होते त्यावेळी वरील ठिकाणी आलेल्या दुचाकी क्रमांक एम. एच. १३. एम. ७२०१ यातील संदीप पैकेकरी याने निष्काळजीपणाने व अति वेगाने दुचाकी चालवून फिर्यादी यांच्या वडिलांना धडक देऊन गंभीरित्या जखमी करण्यास कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.

## डबल ग्रॅज्युएट शिक्षकांना विषय बदलाची संधी द्यावी

✔ सुराज्य/सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता ६ ते ८ वर्गासाठी आरटीई ॲक्टनूसार विज्ञान विषय शिक्षकाचे नेमणूक केल्याने जिल्ह्यात ४००ते ५०० समाजशास्त्र विषय शिक्षक शाळेत जादा झाले आहेत.

या शिक्षकांचे समायोजन प्रलबीत राहील्याने अन्य शाळेच्या शालार्थ मध्ये दाखवून पगार काढत आहेत याचा भविष्यात लेखा आक्षेप लागण्याची शक्यता आहे म्हणून जे समाजशास्त्र विषय शिक्षक डबल ग्रॅज्यूवट आहेत त्यांना विषय बदलून मिळण्याची संधी देऊन समायोजन करावेत अशी मागणी सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिवानंद भरले विरभद्र यादवाड यांनी शिक्षण आयुक्त शिक्षण संचालक शिक्षण उपसंचालक मुख्यकार्यकारी अधीकारी शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.



**४०० ते ५०० जादा विषय शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावावेत**

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की आरटीई ॲक्टनूसार इयत्ता पाचवी ते आठवी वर्गाच्या अध्यापना साठी विषयवार शिक्षकाचे नेमणूक केली त्यावेळी मंजूर पदा मध्ये प्रथम प्राधान्य भाषा द्वीतीय प्राधान्य समाजशास्त्र तीसरा प्राधान्य विज्ञान विषयाला देण्यात आली होती नंतर शासनाने २०१४ च्या पत्रानूसार धोरणात बदल करून प्रथम प्राधान्य भाषा द्वीतीय प्राधान्य विज्ञान व तिसरा प्राधान्य समाजशास्त्र विषयाला दिले त्यानुसार जिल्हात ५०० ते ६०० विज्ञान विषय शिक्षकांची नेमणूक केली असल्याने ४०० ते ४५० समाजशास्त्र विषय शिक्षक जादा झालेत आजच्या स्थीतीला त्यांना बसवून पगार देण्यात येत आहे शिवाय अन्य शाळेच्या शालार्थ मध्ये दाखवून पगार काढत आहेत याचा भविष्यात लेखा आक्षेप लागण्याची शक्य ता नाकारता येत नाही म्हणून या समाजशास्त्र विषय शिक्षकात डबल ग्रॅज्यूवट असलेल्याना विषय बदलून समायोजन करण्यात यावीत असे मागणी केली आहे यावेळी सरचिटणीस सुर्यकात हत्तूरे मजूनाथ भथगुणकी राजकूमार खाडे बालाजी गुरव संतोष जाधव उपस्थित होते.

## चोरट्याने घरासमोरुन दुचाकी पळवली

✔ सुराज्य/सोलापूर : अज्ञात चोरट्याने शिवलीला अपार्टमेंट येथे घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र. एम. एच. १३. सीझेड. ८४८९ हि चोरून नेली आहे. ही घटना दि. १७ ते १८ नंबर दरम्यान घडली. याप्रकरणी जीवराज आनंदनाथ खोबरे (वय-५३, रा. शिवलीला अपार्टमेंट, शेळगी रोड, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

## बलिदान चौकात पैशाच्या कारणावरून लाथाबुक्याने मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर : मंगल भांडाराचे बिल मागितल्याच्या कारणावरून लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना रविवारी दुपारी शहरातील बलिदान चौकाजवळ घडली.

राकेश राजशेखर मोदी (वय २८ रा. विद्यानगर शेळगी) असे जखमीचे नाव आहे. या प्रकरणात जोडभावी पेठच्या पोलिसांनी अजयसिंग सिलकर (रा. हिप्परगा) याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला. राकेश मोदी यांच्या मंगल भांडारातून अजयसिंग सिलकर याने एप्रिल महिन्यात रामनवमी करिता साहित्य नेले होते. आणि त्याचे बिल नंतर देतो असे सांगितले होते. आज दुपारी तो चौकात गाठ पडला. तेंव्हा मोदी यांनी पैशाचे मागणी केली असता त्याने मारहाण करून बघून घेण्याची धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार पवार पुढील तपास करीत आहेत.

## निधन वृत्त

### विश्वनाथ दासरे



✔ सुराज्य/सोलापूर : किणी (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी तसेच अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूरचे माजी पर्यवेक्षक विश्वनाथ सिद्रामप्पा दासरे (वय ८९) यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तुळजापूर वेस, रूपाभवानी रोड, सोलापूर येथील रुद्रभूमी स्मशानभूमित अत्यसंस्कार करण्यात आले.

### कृष्णाबाई जाधव



✔ सुराज्य/सोलापूर : प्रियंका नगर, विजापूर रोड येथील रहिवासी कृष्णाबाई शामराव जाधव (वय ९२) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सूना नातवंडे असा परिवार आहे.

### रुद्रप्पा बिराजदार



✔ सुराज्य/सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथील निवृत्त ग्रामपंचायत कर्मचारी व विद्यमान तंटामुक्त अध्यक्ष रुद्रप्पा शरणप्पा बिराजदार (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.

# अकलूजमध्ये होणार सरपणाविना अंत्यविधी


### पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल

✔ सुराज्य/अकलूज

पर्यावरणाची होणारी हानी, वाढते प्रदुषण याचा प्रामुख्याने विचार करून नागरीकांच्या वेळेची व पैशाची बचत होण्याच्या दृष्टीकोनातून अकलूजमधील हिंदू स्मशानभूमीमध्ये अंत्यविधी आता सरपनाविना होणार आहे. या करिता येथे गॅस दाहिनी बसवण्यास येणार असून त्यासाठी तब्बल १ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम मार्गी लागणार आहे. झाडे लावा, झाडे जगवा या पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून महत्वाच्या संदेशाला मुर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न अकलूज नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे. अंत्यविधीसाठी लागणारे सरपन व सरपनासाठी होणारी झाडांची कत्तल थांबविण्यासाठी नगरपरिषदेने उचललेले हे एक पाऊलच म्हणावे लागेल. याशिवाय उभारण्यात येणाऱ्या गॅस दाहिनीमुळे येथे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरीकांच्या वेळेची व पैशाचीही बचत होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

गॅस दाहिनी बाबत बोलताना गस्टो फार्मा चे डायरेक्टर भाऊसाहेब जंजीरे आणि शशांक वाघ म्हणाले, आपल्याकडे आत्तापर्यंत परंपरेप्रमाणे माणसांचा अंत्यविधी लाकडाच्या सरणावर चिता पेटवून करण्यात येतो. परंतु बदलत्या परिस्थितीनुसार व अत्याधुनिक सोयींच्या उपलब्धतेमुळे आता अंत्यविधी गॅस दाहिनीच्या माध्यमातून होणार आहे. लाकडाच्या सरनावरील अंत्यविधीसाठी जवळपास चार ते पाच हजार रूपयांचा खर्च येतो मात्र गॅस दाहिनीमुळे हा खर्च दोन ते अडीच हजार रूपयांच्या आसपास येणार आहे. लाकडाच्या सरनावरती मृतदेह जाळल्यानंतर त्यातून प्रचंड धूर बाहेर येतो, यामुळे होणारे प्रदुषण व निघणारा वायू याचा माणसाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. याउलट गॅस दाहिनीच्या माध्यमातून होणाऱ्या अंत्यविधी नंतर जो धुर बाहेर निघणार आहे त्यामध्ये कोणतेही विषारी घटक नसणार आहेत आणि महत्वाचे म्हणजे धूर बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र चिमणी बसवण्यात येणार असून त्याची उंची ३० मिटर असणार आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या आणि मानवी आरोग्याच्या दृष्टीकोनातून ही गॅस दहिनी अत्यंत पुरक असणार आहे.




**भूमीपूजन झाले, लवकरच काम सुरू. . .**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या आमदार फंडातून या गॅस दाहिनीची निर्मिती करण्यात येत असून याचे भूमीपूजन नुकतेच आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. राम सातपुते, भाजपा संघटन महामंत्री धैर्यशिल मोहिते-पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, आजी माजी सदस्य व मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.



## देवराज प्राथमिक शाळेच्या बालजत्रेत हजारोंची उलाढाल

सुराज्य/सोलापूर : विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान अवगत व्हावे, या उद्देशाने शांतीनगर येथील देवराज प्राथमिक शाळेत बालदिनाचे औचित्य साधून बुधवारी बालजत्रा आणि मूकनाट्यातून बारा बलुतेदारांची संकल्पना सादर करण्यात आली. विविध प्रकारचे स्टॉल आणि मनोरंजनात्मक खेळाच्या माध्यमातून याठिकाणी हजारो रुपयांची उलाढाल झाली.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका आशाराणी डोके यांनी केले. या बालजत्रेत मनोरंजनात्मक खेळ, भाजीपाला विक्री, किराणा साहित्य, लाकडी वस्तू, पौष्टिक फळे-पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणावर पार पडली. कामगार पालकांना बुधवारची सुट्टी असल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी निता कटारे, गंगूबाई कुलकर्णी, चंद्रकला कांबळे, विश्वनाथ बिराजदार, प्रशांत यादव, पद्मसिंह व्हरडे, वंदना लचमापुरे, मल्लिनाथ अचलेरकर, शशिकला सातपुते, इलियास शेख, प्रसाद साळुंखे, निश्चलदास म्हेत्रे, जयंत गायकवाड, मळसिद्ध केवटे, विनोद माशाळे, स्वाती म्याकल, प्रफुल्लकुमार पाटील, महेश कुंभार आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन करत शंभूलिंग अकतनाळ यांनी आभार मानले.




## चिंचणीला ‘वनश्री’ पुरस्कार जाहीर

पंढरपूर : महाराष्ट्र शासनाच्यावतीने वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षी संस्था संवर्गमधून सुधारित गुणांकनानुसार पंढरपूर तालुक्यातील चिंचणी या गावाला राज्यांमधून तिसरा क्रमांक मिळाला आहे. तर पुणे विभागीय स्तरावर दुसरा क्रमांक मिळाला आहे. चिंचणी या गावातील महिला, ग्रामस्थ, तरुण यांनी गेल्या पंधरा-सोळा वर्षांपासून सातत्याने वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन यामध्ये लोकसहभाग व लोकवर्गणीमधून केलेल्या कामाची दखल घेत शासन निर्णयाद्वारे हा पुरस्कार जाहीर केलेला आहे. या गावांमध्ये आजअखेर सात हजारपेक्षा जास्त झाडे लावून जगवलेली आहेत. यामध्ये फळांची, फुलांची, वनौषधी, शोभेची, जंगली झाडे सुद्धा आहेत. या ठिकाणी प्रत्येक ऋतूमध्ये येणाऱ्या फळांची झाडे आहेत. या गावाने 'झाडांचे गाव' व 'मिनी महाबळेश्वर' म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या ठिकाणी झाडांची संख्या जास्त असल्यामुळे पक्षांचा पण आदिवास जास्त आढळून येत आहे. वृक्ष संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही झाडाला या ठिकाणी ट्री गार्ड लावण्यात आलेले नाही. लोकांनी स्वयंपूर्ततेतून या झाडांचे संरक्षण व पाण्याची व्यवस्था करत ही संपूर्ण झाडे जगवलेली आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये संस्थासंवर्गमधून वृक्ष लागवड व संवर्धनामध्ये ग्रामपंचायत स्तरावरील चिंचणी या गावाला पहिल्यांदाच हा पुरस्कार मिळत आहे. त्यामुळे वेगवेगळ्या स्तरांमधून चिंचणीकरांचे अभिनंदन केले जात आहे. यामुळे सन २०२४ ला राज्यात पहिला क्रमांक आणण्याचा निर्धार यावेळी चिंचणीकरांनी बोलून दाखवलेला आहे. या पुरस्काराचे स्वरूप राज्यस्तरावरील पन्नास हजार रुपये व विभागीय स्तरावर तीस हजार रुपये व सन्मानपत्र असणार आहे. या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत दहा डिसेंबर रोजी होणार आहे.

## कोट्यवधींची जमीन लाटण्याच्या आरोपाप्रकरणी जामीन मंजूर

सोलापूर : बनावट बक्षीस पत्र करून फिर्यादीच्या मालकीची करोडो रुपयांची जमीन लाटण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाप्रकरणी येथील रामू तिपण्णा कोळी (वय ४५ रा- १६९/१ पोगूल मळा, अक्कलकोट रोड, सोलापूर) यास मुख्य न्याय दंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी रक्कम रु. १५,०००/- च्या जात मुचलक्यावर मुक्त करण्याचा आदेश दिला आहे.

फिर्यादी श्रीनिवास मोगलप्पा पोगूल यांनी सदर बाजार पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, सोलापूर महानगरपालिका हद्दीत अक्कलकोट रोड येथील त्यांना १९६३ साली वारसा हक्काने ४ हेक्टर १७ आर क्षेत्रफळाची जमीन त्यांचे वाटणीस आली होती. रामू तिपण्णा कोळी व त्याचे साथीदारांनी संगनमत करून वर नमूद मिळकत ही १९८८ साली फिर्यादीने रामू तिपण्णा कोळी यास बक्षीस पत्राद्वारे लिहून दिल्याचे बनावट बक्षीसपत्र दस्त तयार केला. सदर बनावट बक्षीसपत्राचा वापर करून आरोपीने मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर त्याच्या नावाची नोंद करून घेतली. सदर बनावट कागदपत्राआधारे भूसंपादन मंजूर रक्कम फिर्यादीस न देता ती आरोपीस देण्यात यावी याकरिता भूसंपादन कार्यालयात हरकत घेतली, अशी फिर्याद सदर बाजार पोलिसात आरोपी रामू तिपण्णा कोळी व त्याचे साथीदारांविरुद्ध दाखल केली. त्यानंतर रामू तिपण्णा कोळी याच्या विरुद्ध बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक करणे या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस सदर बाजार पोलिसांनी गुन्ह्याकामी अटक केली. तद्नंतर आरोपीने ॲड. प्रशांत नवगिरेमार्फत जामीन मिळण्याकरिता अर्ज दाखल केला. आरोपी हा वर्षानुवर्षे सदर नमूद मिळकतीत वास्तव्यास आहे, मिळकत आरोपीच्या कब्जेवहीवाटीत असून आरोपीच्या नावे सातबारा उताऱ्याची नोंद आहे. सन २०१४ साली घेतलेले विद्युत कनेक्शन आहे, गॅस कनेक्शन आहे तसेच इतर कागदपत्रे पुरावा असून मिळकत ही आरोपीच्या कब्जेवहीवाटीत वर्षानुवर्षे असल्याचे दर्शवते. प्रकरण हे दिवाणी स्वरूपाचे आहे. परंतु गैरमार्गाने फिर्यादीने रामू कोळी यास फौजदारी प्रकरणात अडकवले आहे. आरोपीने भूसंपादन कार्यालयात देखील कायदेशीर मार्गाने हरकत घेतली आहे. आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल झाले आहे. असा युक्तिवाद केला. न्यायालयाने आरोपीस रक्कम रू. १५ हजार चा जामीन मंजूर केला. यात आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सागर मंद्रुपकर तर सरकारतर्फे ॲड. डोके व फिर्यादीतर्फे ॲड. संतोष न्हावकर यांनी काम पाहिले.

# शिक्षकसेवक, आरोग्यसेवक आणि कृषीसेवकांच्या मानधनात वाढ

सुराज्य/सोलापूर

**गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण सेवकांच्या मानधनात २५ हजार रुपयाची वाढ करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब शिक्षक महासंघाच्यावतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, शिक्षण सचिव, प्राथमिक /माध्यमिक विभागाचे शिक्षण संचालक, शिक्षण आयुक्त यांच्याकडे करण्यात येत होती. अखेर या मागणीस मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आले. कास्ट्राईब संघटनेचे राज्याध्यक्ष कांबळे यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे सांगितले. त्यामुळे शिक्षकसेवकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.**



यामध्ये मागील पंधरा वर्षांपासून कंत्राटी पद्धतीवर काम करणारे व तुटपुंज्या मानधनावर काम करणारे शिक्षकसेवक, आरोग्य सेवक आणि कृषीसेवक यांना केवळ पंधरा-वीस वर्षांपासून सहा हजार रुपये मानधन दिले जात होते. त्या मागणी संदर्भात गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता. पाच हजारावरून २५ हजार रुपयांचे मानधनाची मागणी करण्यात आली होती. त्यावरून दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी यासंदर्भात मंत्रालयामध्ये बैठक झाली आणि त्या बैठकीचा निर्णय दि. १८ ऑक्टोबर २०२२ रोजी झाला असून त्यास मान्यता दिली असल्याचे लेखी पत्र राज्याचे सचिव सरिता बांदेकर यांनी संघटनेकडे दिले आहे.

यामध्ये शिक्षणसेवक (प्राथमिक), कृषीसेवक, आरोग्यसेवक, ग्रामसेवक यांना १६ हजार रुपये मानधन वाढ करण्यात आले आहे. शिक्षण सेवक माध्यमिक यांना १८ हजाररुपये वाढ करण्यात आले आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब शिक्षक महासंघाच्या प्रयत्नामुळे आरोग्य सेवक ग्रामसेवक व शिक्षण सेवक यांना वाढीव मानधन लवकरच देण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब शिक्षक महासंघाचे राज्याध्यक्ष गौतम कांबळे यांनी दिली.

यावेळी राज्य महासचिव विठ्ठल सावंत, राज्य कोषाध्यक्ष दादासाहेब डाळिंबे, राज्य कार्याध्यक्ष चंद्रकांत सलवदे, पुणे जिल्हाध्यक्ष विनोद चव्हाण व हवेली तालुकाध्यक्ष राहुल गायकवाड हे पदाधिकारी उपस्थित होते.



## उत्तर सोलापूर तालुक्यात साडेतीन लाखांची दारु जप्त

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

सुराज्य/सोलापूर

**राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक ब विभागाचे पथकाने दि.१९ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा व कळमण या ठिकाणी गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेली विदेशी मद्य जप्त केले. या कारवाईत एकूण ३ लाख ४८ हजार ९९० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती नितीन धार्मिक यांनी दिली.**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक ब सदानंद मस्करे यांना १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास सोलापूर-बार्शी रोडवरील वडाळा गावाचे हद्दीत एका कारमधून गोवा राज्याच्या विदेशी मद्याची वाहतूक होणार आहे, अशी माहिती मिळाली.त्यानुसार सापळा रचला असता त्यांना संशयित वाहन एम.एच.१२. बीव्ही. ३६५९ सोलापूरकडून बार्शीकडे येताना दिसताच त्यांनी वाहनास अडवून त्याची झडती घेतली असता, वाहनात वाहन चालक श्रीनिवास विठ्ठल वाघमारे (रा. कळमण ता. उत्तर सोलापूर) या इसमाच्या ताब्यातून ४८ बाटल्या अशा विदेशी मद्याचा साठा जप्त करण्यात आल्या.

पुढील तपासात आरोपीच्या कळमन (ता. उत्तर सोलापूर) येथील राहत्या घरातून राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथकाने गोवा राज्यनिर्मित ७५० मिली क्षमतेच्या आहे. चॉईस ब्रॅण्ड विदेशी मद्याच्या १९१ बाटल्या, मॅकडॉवेल नंबर वन व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या १९२ बाटल्या, महाराष्ट्र राज्याच्या विदेशी मद्याच्या विविध ब्रँडच्या रिकाम्या बाटल्या व बुचे जप्त केले. या कारवाईत वाहनाच्या दीड लाख किंमतीसह एकूण ३ लाख ४८ हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

आरोपीला दि. २० नोव्हेंबर रोजी दारूबंदी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसाची एक्साईज कस्टडी सुनावली असून, गुन्ह्याचा तपास दुय्यम निरीक्षक ब १ विभाग गणेश उंडे हे करीत आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक, उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सदानंद मस्करे, दुय्यम निरीक्षक अंकुश अवताडे, गणेश उंडे, सहायक दुय्यम निरीक्षक गजानन होळकर, जवान अनिल पांढरे, प्रशांत इंगोले, इस्माईल गोडीकट व वाहन चालक रशीद शेख व संजय नवले यांच्या पथकाने केली.

## फसवणूक प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

लावण्यखणी कार्यक्रमाची संपूर्ण माहिती घेऊन विश्वास संपादन करत कार्यक्रमाची तारीख ठरवून ४५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ९ ते १० नोव्हेंबर दरम्यान भवानी पेठ येथे घडली. याप्रकरणी विजयकुमार पांडुरंग साळुंखे (वय-६४, व्यवसाय लावण्यखणी निर्माता व वितरक, रा. भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मोबाईल क्र. ९१६८६६३८९५ चा धारक आयपीएस हनिफ शेख, मो. क्र. ९८५००५८४८८ चा धारक अनिकेत, मो. क्र. ९५२९९३४७३८ चा धारक इलियास अन्सारी व मो. क्र. ९५७९३५१२७९ चा धारक सुनील यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी यांच्या मोबाईलवर इलियास अन्सारी यांचा फोन आला. मोबाईलवर कॉल आलेल्या इसमाने मी पिरवाडी निपाणी जिल्हा बेळगाव येथून बोलत असल्याचे सांगितले. त्यानंतर संशयित आरोपी हनिफ शेख यांचा तुम्हांला फोन येईल, असे सांगून शेख याने कॉल करून फिर्यादीकडून कार्यक्रमाची संपूर्ण माहिती घेऊन विश्वास संपादन केला. त्यानंतर दि.१० नोव्हेंबर रोजी कार्यक्रमाचे तारीख ठरवून कार्यक्रमाचे १ लाख ११ हजार रुपये मानधन व तुमच्या कार्यक्रमात माझा अनिकेत नावाचा पाहुणा कलाकार काम करणार असून, त्याचे ४ लाख ५० हजार रुपये मानधन ठरवून जीएसटी व टीडीएससह सहा लाख रुपये होतात, त्यापैकी तीन लाख रुपये मी तुम्हांला ॲडव्हान्समध्ये पाठवतो, असे म्हणून जमा केल्याचा खोटा मेसेज फिर्यादीला पाठवला. त्यानंतर अनिकेत याने फिर्यादीस ॲडव्हान्ससाठी वारंवार फोन करून त्यांची अडचण सांगून फिर्यादीकडून प्रयोगासाठी त्यांच्या मानधनातून काही रक्कम मला पाठवा असे सांगितले. तसेच फिर्यादी यांनी फोन पे द्वारे ४५ हजार रुपये पाठवले. कार्यक्रमाचा ॲडव्हान्स पाठवतो, असे भासवून ४५ हजार रुपयांची फसवणूक केली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे.

## महिला वैद्यकीय अधिकारीची दुचाकी लंपास

सुराज्य/सोलापूर : सिव्हिल हॉस्पिटल येथे पीएम रूमच्या समोर पार्किंगमध्ये पार्क करून ठेवलेली एक्टिवा दुचाकी क्रमांक एम.एच.४७.बीई.६४०८ अज्ञात चोरट्याने नेली आहे. याप्रकरणी वैष्णवी कल्पेश गोर (वय-२३, रा. ए वन इंटर्न लेडीज होस्टेल, सिव्हिल हॉस्पिटल) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## राज्यस्तरीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत विरेश शरणार्थीचे यश

सुराज्य/सोलापूर

नुकत्याच इंदापूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सोलापूर चेस ॲकॅडमीच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू विरेश शरणार्थी याने सहा गुणांसह, १५ वर्षाखालील गटात आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रेया हिप्परगी हिने व १० वर्षाखालील गटात सानवी गोरे यांनी सातपैकी साडेसहा गुण प्राप्त करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, अहमदनगर, सातारा आदी जिल्ह्यातील ४१ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह एकूण १५४ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. अतीशय चुरशीने झालेल्या अंतिम फेरीत विरेशने सुरेख खेळ करत कोल्हापूरच्या मानांकित रवींद्र निकामचा पराभव करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब करत रोख पारितोषिक व चषक पटकाविला. तसेच अंतिम फेरीत आघाडीवर असणाऱ्या श्रेयाने कोणताही धोका न पत्करता आदित्य चव्हाण याच्याशी बरोबरी साधत तर सानवीने सुरुवातीपासूनच आक्रमकरित्या खेळत तन्मयी घाटेचा पराभव करत जेतेपद संपादन केले. पंधरा वर्षाखालील गटात ईश्वरी जगदाळे, ओम चिनगुंडे व आदित्य कोळी यांनी देखील चांगली कामगिरी करत अनुक्रमे चौथा, पाचवा व सहावा क्रमांक तर १० वर्षांखालील गटात अनन्या उलभगत हिने नववे स्थान प्राप्त करत यश संपादन करत सोलापूर चेस ॲकॅडमीचे वर्चस्व प्रस्थापित केले.

इंदापूर येथील बुद्धिबळ स्पर्धेत तिसरा क्रमांक प्राप्त केलेल्या मानस गायकवाड याने गोरेगाव व अहमदनगर येथील आंतरराष्ट्रीय गुणांकन स्पर्धेत यश मिळवत रुपये ११,५०० तर श्लोक शरणार्थी याने सुरेख खेळ करत अहमदनगर तेथील बुद्धिबळ स्पर्धेत १६०० गुणांकनाखालील कॅटेगरीमध्ये उपविजेतेपद पटकावित एकूण १६,६०० रोख पारितोषिक व चषक पटकावले. तसेच विरेशने इंदापूरसह गोरेगाव, अहमदनगर येथील आंतरराष्ट्रीय गुणांकन तसेच रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत एकूण रुपये ३१,१०० रोख पारितोषिकासह आकर्षक चषक मिळवीत उल्लेखनीय यश प्राप्त केले.

## टिपू सुलतान रयतेच्या कल्याणासाठी झटले : शिंदे

सुराज्य/सोलापूर

रयतेच्या अडीअडचणी दूर करुन ती सुखी संपन्न राहिले पाहिजे यासाठी टिपू सुलताननी आपल्या सल्तनतीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था उभी केली, विविध उद्योग उभा राहिले, शेतीच उत्पन्न वाढविण्यासाठी जलसंधारणावर भर दिले, वनौषधींची शेती करणाऱ्यासाठी रोपवाटिका तयार केले, आयात निर्यात करुन बाजारपेठ स्थापन केली. हिंदू प्रजेच्या न्यायनिवाड्यासाठी स्वतंत्र न्यायालये सुरू केले. रयतेच्या कल्याणासाठी झटलेल्या छत्रपती शिवरायानंतर टिपू सुलताननी हे कार्य हाती घेतले, असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे यांनी व्यक्त केले.




छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने टिपू सुलतान जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मौलाना जबीउला कासमी हे होते. यावेळी माजी महापौर आरिफ शेख, बाळासाहेब वाघमारे, रियाज हुंडेकरी, सौ. श्रीदेवी फुलारी, वाहेदा भंडाले, पिर अहमद शेख, लतिफ शाबदी, हारुन शेख हे माजी नगरसेवक तसेच राम गायकवाड, ड. गोविंद पाटील, सुरेश ननवरे, पोपट भोसले, प्रकाश शिंदे, रमेश पवार, प्रा. मोहित निकम उपस्थित होते.

## विजयाची शिदोरी मातोश्रीवर घेऊन जाऊ : वानकर

सुराज्य/उत्तर सोलापूर

**तालुक्यातील १२ ग्रामपंचायतमध्ये निवडणुकीची रणांगणाची तयारी चालू आहे.आपण देखील भगवा फडकवून विजयाची शिदोरी मातोश्रीवर घेऊन जाण्यासाठी सज्ज व्हा, सरपंच, उपसरपंच व सद्स्य आपलेच झाले पाहिजे. शिवसेनेचे सर्व पदाधिकारी आपल्या पाठीशी असून ताकदीने पुढे व्हा असे शिवसेनेचे जिल्हा प्रमुख गणेश वानकर यांनी उपस्थित शिवसैनिकाना आवाहन केले आहे.**

उद्धव बाळासाहेब ठाकरेगटाची उत्तरची बैठक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश वानकर, उपजिल्हा प्रमुख विक्रांत काकडे, उत्तर तालुका प्रमुख संजय पौळ, समन्वयक वजीर शेख उपस्थित होते. प्रकाश वानकर यांनी जुन्या आठवणीला उजाळा देत आपण शिवसेना कशी फुलवली याची आठवण नवनिर्वाचित शिवसैनिकाना दिली. तालुका प्रमुख प्रमुख संजय पौळ यांनी उत्तर तालुक्यातील सर्व गावामध्ये शिवसेनेची गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक करण्याचा मानस आहे.



येणाऱ्या सर्व निवडणुकीत आपण शिवसेनेला घवघवीत यश मिळवून देण्याच्या प्रयत्न करणार आहोत. उत्तर तालुक्यातील पदाधिकारी निवड पुढीलप्रमाणे- उपतालुका प्रमुख- अच्युतराव बाभळे, सचिन घोडके, सदाशिव सलगर, विभाग प्रमुख- लक्ष्मण मुळे, महेश साठे, हरिदास कुंभार, विनोद चौगुले, उपविभाग प्रमुख-अरुण लोंढे, विशाल खांडेकर, दत्ता वाघमारे, सचिन वाघमारे, श्रीकांत अदाटे, सतीश दत्ता गरड, नागनाथ गुत्ती, भाऊ माळी, पांडुरंग मळगे, केदार गुंड, बापू गुजर, अकोलेकाटी शाखाप्रमुख-सोमनाथ मोहोळकर, वांगी-शशिकांत (प्रमोद) सुपाते, राणमसले युवासेना शाखाप्रमुख-योगेश गरड, मार्डी शिवसेना शाखा प्रमुख-विनोद जगताप, कळमण-उमाकांत पवार, प्रसिद्धी प्रमुख-प्रशांत चव्हाण, अमोल जाधव यांच्या निवडी करण्यात आल्या.

यावेळी महिला आघाडी परिणिता शिंदे, युवासेना उपजिल्हा प्रमुख प्रसाद निळ, युवासेना तालुका प्रमुख अजिंक्य देशमुख, हुकूम राठोड, बाबा निळ, नशीर शेख, आण्णा पाटील, लक्ष्मण गिरी, विष्णु भोसले, विष्णु माळी, ज्ञानेश्वर आतकरे, दत्ता शिंदे, गणेश काळे, ज्ञानेश्वर जगताप, राजू घाटे, महेंद डोंबाळे, नारायण जगताप, आण्णा गडदे, शशिकांत आतकरे उपस्थित होते.

### नावात बदल

माझे जुने नाव **जयमाला चंद्रकांत बिरादार** असे होते. माझे नावात बदल झाला असून माझे नवीन नाव **सौ. पुजा मल्लिकार्जुन तरनळी**, रा.बेन्नूर नगर, न्यु. आर. टी. ओ. ऑफिस, विजापूर रोड, सोलापूर असे आहे व भविष्यात असेच राहणार आहे.

**ॲफिडेव्हिट नंबर**
**22531901112685003986 29**
दि.01/11/2022

# अक्कलकोट तालुक्याच्या राजकारणात पूर्ण शक्तीनिशी एन्ट्री करणार : शिंदे

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात आता राजकारणात प्रत्येकाच्या आमदारकीच्या इच्छा अपेक्षा पूर्ण झालेल्या आहेत. शिंदे घराणे एकच शिल्लक आहे. माझ्या वडिलांचे म्हणजे बलभीमभाऊ शिंदे यांचे स्वप्न अजूनही अधुरे आहे. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी आता मी झटत असून आगामी काळात आपली तालुक्याच्या राजकारणात पूर्ण ताकदीनिशी एन्ट्री राहणार आहे. तालुक्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आपण सर्वांनी ताकद द्यावी, असे आवाहन धोत्री येथील गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे यांनी केले.

कुरनूर येथे हजरत पीर सातू बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने त्यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी राजकिय विषयावर त्यांनी भाष्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते दिलीप काजळे हे होते. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच व्यंकट मोरे यांनी केले. त्यांनी गावातील महत्त्वाची विकास कामे कशी केली. पुढे काय करणार आहोत याची माहिती देत असताना आपल्या पाठीमागे माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे आणि



चेअरमन दत्ता शिंदे यांची ताकद आहे, मी मागे हटणार कार्यकर्ता नाही, असे ते म्हणाले.

पुढे बोलताना चेअरमन दत्ता शिंदे म्हणाले की, आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले ते आमदार झाले. त्यांच्याबद्दल मला काहीच बोलायचे नाही परंतु आम्ही गोकुळ शुगरची स्थापना ही शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेली आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे कल्याण करत आहोत. मध्यंतरीच्या काळात काही अडचणी आल्या परंतु आम्ही डगमगलो नाही.

आता पूर्ण वेळ राजकारण व समाजकारण करण्याची माझी तयारी आहे. चपळगाव मतदार संघातून यापूर्वी माझे वडील बलभीम भाऊ शिंदे हे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य होऊन गेले. त्यानंतर ते आमदारकीच्याही अतिशय जवळ गेले परंतु ते स्वप्न अधुरे राहिले म्हणून आम्ही आता झपाट्याने कामाला लागलो आहोत. यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्यातील अनेक दिग्गज नेते मंडळी आपल्या पाठीशी आहेत. त्यांच्या पाठिंब्यावरती आणि तुमच्या आशीर्वादाने आपण आगामी काळात राजकीय क्षेत्रात मोठे पाऊल टाकत आहोत. कारखानदारी टिकवण्यासाठी राजकारणात राहणे गरजेचे आहे. यातूनच सर्वसामान्य माणसांचा आणि शेतकऱ्यांचा व तालुक्याचा विकास होऊ शकतो. आतापर्यंत जे जे प्रश्न तालुक्याचे प्रलंबित राहिलेत ते प्रश्न अजूनही प्रलंबितच आहेत. ते मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत ते सोडविणे हेच माझे ध्येय राहील. योग्य वेळ येताच आम्ही तुमच्यासमोर येऊ, असेही ते म्हणाले. यावर्षीच्या गळीत हंगामाला ऊस घालणाऱ्या शेतकऱ्यांनाही योग्य दर देण्याबरोबरच त्यांचे सर्व ऊस अडचणीविना आपण कारखान्याला घेऊन जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. कोणाची काही अडचण असल्यास थेट आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी यात्रेतील उपस्थित भाविक व नागरिकांनी शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शिट्याचा गजर केला. यावेळी माजी उपसभापती सिध्दार्थ गायकवाड, सिध्दाराम भंडारकवठे, मोट्याळचे सरपंच कार्तिक पाटील, युवा नेते राजू चव्हाण, चुंगीचे माजी सरपंच इरसंगप्पा गड्डे, उद्योगपती शाम चेंडके, जैनोद्दीन पठाण, तंटामुक्त अध्यक्ष केशव मोरे, उपसरपंच आयुब तांबोळी, अमर मोरे, संभाजी बेडगे, स्वामीराव सुरवसे, अभिजीत गुंड, राजू गवळी आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिंदे यांच्या हस्ते कुरनूर ग्रामपंचायतीच्यावतीने नवीन शर्त कमी केलेल्या दोन मालमत्ता उताऱ्याचे प्रतिनिधीक स्वरूपात वाटप करण्यात आले. कुरनूर ग्रामपंचायतीला नुकताच उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार मिळाला आहे त्याबद्दलही सरपंच व्यंकट मोरे यांचा ग्रामस्थ व युवक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात तालुक्यातील काही पत्रकारांचा आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



## अक्कलकोटमध्ये स्वामी भक्तांची उत्कृष्ट व्यवस्था : धूरजड

सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली स्वामी भक्तांची उत्कृष्ठ व्यवस्था होत असल्याचे मनोगत राज्याचे माजी आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यंड्रावकर यांचे खाजगी सचिव रविंद्र धुरजड यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वअस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समावेत माजी राज्यमंत्री ओमप्रकाश तथा बच्चू कडू यांचे विशेष कार्याधिकारी सातलिंग स्वामी, शिवराज स्वामी, महेश स्वामी हे उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, सिध्दाराम कल्याणी, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, सतिश महिंद्रकर, नामा भोसले, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, गोविंदराव शिंदे, अतिश पवार, अभियंता अमित थोरात, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, निखील पाटील, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



## तुळशी जि.प. शाळेस आवटे परिवाराकडून संगणक भेट

सुराज्य/मोडनिंब : तुळशी गावचे सुपुत्र कै. अंकुश नारायण आवटे गुरुजी यांच्या पाचव्या पुण्यस्मरणा निमित्त श्रीमती अनुराधा अंकुश आवटे, अभिजीत अंकुश आवटे, नवनाथ नारायण आवटे यांनी तुळशी जिल्हा परिषद शाळेला संगणक भेट दिला. विद्यार्थ्यांना विज्ञान-तंत्रज्ञानाबाबतचे शिक्षण देण्यासाठी संगणक काळाची गरज आहे हे ओळखून आवटे परिवाराने शाळेत संगणक भेट दिला. अरण केंद्राचे केंद्रप्रमुख राजन सावंत सर, मुख्याध्यापक जयराम दगडे, शिवप्रसाद पवार यांनी कै. अंकुश आवटे गुरुजींच्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी तुळशी गावचे सरपंच प्रतिनिधी दिगंबर मामा माळी उपसरपंच डॉ. शरद मोरे, माजी सरपंच पांडुरंग आण्णा गव्हाणे, चेअरमन बळीराम दाजी अनपट, भास्कर वाघमारे, आहेरगाव शाळेचे मुख्याध्यापक सुखदेव खांडेकर शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. आवटे परिवाराचे व उपस्थित मान्यवरांचे आभार बलभीम गोरे यांनी मानले.



## मराठा समाजातील युवकांनी योजनेचा लाभ घ्यावा- पाटील

सुराज्य/उत्तर सोलापूर : मराठा समाजातील सर्व युवक, युवतींनी मराठा महामंडळातील विविध योजनांचा लाभ घ्यावेत असे आवाहन नरेंद्र पाटील यांनी केलं आहे. नरेंद्रजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भाजपा कार्यालयात बैठक संपन्न झाली. मराठा समाजातील युवक व युवतींनी आर्थिक प्रोत्साहन देण्याकरीता मार्गदर्शन, लघु उद्योग, मध्यम व मोठ्या उद्योगांक स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. नोकरी च्या मागे न लागता रोजगार उपलब्ध करून द्यावा, लहान मोठा व्यवसाय चालू करावेत असे आवाहन करण्यात आले. लागणारे कागदपत्रे, बँकांची लोन, व्याज परतावा व इतर बाबींसाठी योग्य ते मार्गदर्शनही केले जाईल, यावेळी भाजप शहराध्यक्ष- विक्रम देशमुख, जिल्हा संघटक- शशिकांत चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष गणेश भोसले, माजी नगरसेवक आनंद जाधव यांच्यासह कार्यकर्त उपस्थित होते.

## पताळे खून प्रकरणात आरोपीस ५ दिवसांची पोलीस कोठडी

सुराज्य/वेळापूर : खंडाळी तालुका माळशिरस येथे दिनांक १९।११।२०२२ रोजी सकाळी ११. १५ च्या सुमारास आरोपी नारायण मु गु टराव पताळे याने मागील भांडणाचा राग मनात धरून पुतण्या रामचंद्र दिनकर पताळे वय ४५ राहणार पताळे वस्ती खंडाळी निमगावरोड याला त्यांच्या शेतातील गहू पिकाच्या पाण्याच्या दंडामध्ये पालथे पाडून मानेवर पाय ठेवून श्वास कोंडून जीवे ठार मारल्याची फिर्याद प्रमाणे वेळापूर पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर ३२२ कलम ३०२, ३२३ प्रमाणे नारायण मुगुटराव पताळे यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. व या खुन प्रकरणात नारायण पताळे यास वेळापुर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव, पोलिस उप निरीक्षक संजय रेगुडे यांनी अटक करुन माळशिरस न्यायालयासमोर उभे केले असता त्यास न्यायालयाने त्याला रविवार रोजी ५ दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे.

## 'जेता' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

सुराज्य/सोलापूर : असंख्य संकटांवर मात करत अनेक वादळांना कवेत घेत प्रचंड जिद्दीच्या बळावर विजयी होणाऱ्या विजेत्याची कहाणी सांगणारा 'जेता' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच 'जेता'चा उत्साहवर्धक ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. या ट्रेलरचं सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे. २५ नोव्हेंबर रोजी 'जेता' संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. संजू एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली निर्माते संजय लक्ष्मणराव यादव यांनी सहनिर्माते मिहीर संजय यादव यांच्या साथीने 'जेता' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा दिग्दर्शक योगेश साहेबराव महाजन यांनी सांभाळली आहे. संजय लक्ष्मणराव यादव यांनी कथा लिहिली असून, योगेश सबनीस आणि योगेश साहेबराव महाजन यांच्या साथीने त्यांनी पटकथाही लिहीली आहे. याबाबत दिग्दर्शक योगेश महाजन म्हणाले की, आजच्या युगातील कथा सादर करताना 'जेता'ला प्रेमकथाची गुलाबी किनारही जोडण्यात आली आहे. नीतिश चव्हाण आणि स्नेहल देशमुख या नव्या कोऱ्या जोडीची केमिस्ट्रीही प्रेक्षकांना आकर्षित करेल अशी भावना निर्माते संजय लक्ष्मणराव यादव यांनी व्यक्त केली.



## सिध्दनाथ जोगेश्वरी ग्रामदैवताची यात्रा साजरी

सुराज्य/वेळापूर

तांदुळवाडी तालुका माळशिरस येथील ग्रामस्थांचे आराध्य दैवत श्री सिध्दनाथ जोगेश्वरीचे तीन दिवसाची यात्रा सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमाने, काठी मिरवणुकीने गुलालाची उधळण करत यात्रा उत्साहात साजरी झाली.

पहिल्या दिवशी काळभैरवनाथ जन्मोत्सव निमित्त मंदिरासमोर पारंपारिक पध्दतीने लेझीम खेळ, व गजी ढोलचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये ग्रामस्थांनी तसेच विविध गावचे गझीढोल यांनी सहभाग घेतला होता. सायंकाळी ह भ प अनिरुध्द महाराज निंबाळकर यांचा कीर्तनाचा कार्यक्रम रात्री दहा वाजता संपन्न होऊन त्यानंतर पुष्पवृष्टीचा कार्यक्रम झाला व रात्री भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला ग्रामस्थ, महिला, तरुण वर्ग, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता सिध्दनाथ जोगेश्वराला महापूजा घालण्यात आली व सायंकाळी ह भ प लक्ष्मण महाराज राजगुरू यांचा भारुडाचा कार्यक्रम संपन्न झाला.

तिसऱ्या दिवशी ग्रामदैवत श्री सिध्दनाथ जोगेश्वरी दैवताच्या पादुकांची व काठीची मिरवणूक तांदुळवाडी गावातुन सकाळी आठ वाजल्यापासून काढण्यात आली, या काठी मिरवणुकीत सर्व ग्रामस्थ, लहान, थोर, भाविक मोठ्या संख्येने सहभागी होऊन सिध्दनाथाचा जयजयकार करत गुलालाची मुक्त उधळण केली सदर मिरवणुक ग्रामदैवत सिध्दनाथ जोगेश्वरी मंदिरा समोर येऊन यात्रा सोहळ्याची सांगता झाली.

हा यात्रा सोहळा पार पाडण्यासाठी तांदुळवाडी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य तसेच यात्रा नियोजन समितीचे सर्व सदस्य आणि ग्रामस्थ सर्वांनी परिश्रम घेतले.

## पैशांच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ

सुराज्य/सोलापूर : बांधकामाच्या साहित्य घेण्यासाठी पैशाची मागणी करत विवाहित त्याचा छळ करून त्रास दिल्याची घटना दि. १६ ऑक्टोंबर २०११ ते १८ नोव्हेंबर २०२२ पर्यंत घडली. याप्रकरणी सावित्री पिराप्पा वाघमारे (वय-३३, रा. सोनामाता नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पिराप्पा धोंडीबा वाघमारे (रा. गरिबी हटाव झोपडपट्टी नंबर-२) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी यांचा विवाह पिराप्पा वाघमारे यांच्यासोबत दि. २३ मार्च २००५ साले झाला होता. लग्नानंतर फिर्यादी सावित्री वाघमारे यांना दोन वर्षे व्यवस्थित नांदविले. त्यानंतर मात्र फिर्यादीस वारंवार त्रास देऊन बांधकामाचे साहित्य घेण्यासाठी पैशाची मागणी करत मानसिक व शारीरिक त्रास देऊन आर्थिक छळ केला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल ताटे हे करीत आहेत.

## २१ नोव्हेंबरपर्यंत वीज बिल भरा अन्यथा वीजपुरवठा खंडित

### महावितरणचा शेतकऱ्यांना इशारा

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना महावितरण कंपनीकडुन २१ नोव्हेंबर पर्यत आपली शेतीपंपांची विजबिले भरा अन्यथा २२ नोव्हेंबर पासून वीजपुरवठा खंडित करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. प्रती एच पी १५०० रुपये प्रमाणे बिल भरण्यात यावे असा इशारा महावितरण कंपनीने शेतकऱ्यांना दिला आहे.

तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांच्या मागे विज बिल वसुलीसाठी तगादा लावला होता त्यावेळेस विरोधी पक्षात असणाऱ्या भाजपने तीव्र आंदोलन केले होते माळशिरस तालुक्याचे आमदार रामभाऊ सातपुते यांनी तर रस्त्यावर उतरुन माळशिरस येथे शेतकरी बांधवांना घेऊन रस्ता रोको आंदोलन केले होते. त्यानंतर तोडगा निघाला होता व खंडीत केलेला वीजपुरवठा सुरळीत केला होता. आता परिस्थिती बदलली आहे त्यावेळेस विरोधात असणारी भाजपा आता सत्तेत आहे तर सत्तेतील राष्ट्रवादी काँग्रेस विरोधात आहे. मग आता शेतकऱ्यांनसाठी कोण आंदोलन करणार हा खरा प्रश्न आहे. ३ एचपी साठी ५००० तर ५ एच पीसाठी ७५०० रुपये एवढे बिल भरण्याची महावितरणची मागणी आहे. यंदा एकतर पाऊसमान कमी आहे यामुळे पिक पाणी एवढे चांगले नाही अजुन ऊस शेतात उभा आहे शेतकऱ्यांनकडे पैसे नाहीत आणी महावितरणचा विजबिलासाठी तगादा सुरु झाला आहे. त्यावेळी विरोधात असणारी भाजप शेतकऱ्यांनसाठी रस्त्यावर उतरली होती मग आता सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांनची बाजु घेणार का हा प्रश्न शेतकरी विचारीत आहेत. मग विरोधात असणारी महाविकास आघाडी यामध्ये शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी, काँग्रेस शेतकऱ्यांनसाठी रस्त्यावर उतरणार का हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

याविषयी माळशिरस तालुक्याचे आमदार रामभाऊ सातपुते यांना विचारले असता महाविकास आघाडीचे सरकार असताना आपण वीजपुरवठा खंडित केल्यावर आंदोलन केले होते आता आपले सरकार सत्तेत आहे मग आपण काय करणार असे विचारले असता मला याविषयी माहीत नाही माहीती घेऊन सांगतो असे उत्तर त्यांनी दिले.

## सिव्हिल हॉस्पिटलमधून दुचाकी चोरीला

सुराज्य/सोलापूर : सिव्हिल हॉस्पिटल समोरील ओपीडी समोर असलेल्या पार्किंगमध्ये दुचाकी क्र. एम. एच. १३. बीएच. ६७१४ ही



अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. हि घटना दि. १४ ते १५ नोव्हेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी ज्ञानेश्वर भारत राठोड (वय-२३, रा. एमजीएस बॉईज हॉस्टेल होटगी नाका, सोलापूर) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल नदाफ हे करीत आहेत.

## शॉर्टसर्किटमुळे कोरवलीत ५ एकर ऊस जळाला



सुराज्य/विरवडे :

मोहोळ तालुक्यातील कोरवली येथे शुक्रवार १८ रोजी दुपारी दोनच्या दरम्यान विजेच्या डी. पी. वर झालेल्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत जवळपास सव्वा पाच एकर पेक्षा जास्त ऊस जळून खाक झाले. गावातील युवकांनी धाडस दाखवत आग विझविण्याचा ऑटोकाठ प्रयत्न केला त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे ऊस या आगीपासून बचावले.

उसाच्या पाडाला लागलेल्या आगीत बसवंत सुधाकर म्हमाणे यांचे गट नंबर ३९६ मधील सव्वा एकर, रवी आप्पासाहेब लंगरे यांचे गट नंबर ४०० मधील २ एकर, गुरबाळा नामदेव म्हमाणे यांचे गट नंबर २२३ मधील २ एकर असे सव्वा पाच एकर ऊस तर चंद्रशेखर मुरारी म्हमाणे यांचे गट नंबर ४०१/२ व रामचंद्र मुरारी म्हमाणे यांचे गट नंबर ४०१/३ मधील प्रत्येकी एक एकर नुकत्याच कारखान्यास गेलेल्या उसाच्या क्षेत्रातील ठिबक जळून खाक झाले यामुळे या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. जळालेल्या उसाचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी रवी लंगरे यांनी केली आहे.

## आचेगावमध्ये निवडणुकीसाठी इच्छुकांची धावपळ

सुराज्य/अक्कलकोट

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामपंचायत पंचवार्षिक निवडूक जाहीर असून इच्छुकांची धावपळ वाढली असल्याने सर्व पॅनलचे नेतेगण कामाला लागले असल्याचे चित्र गावात दिसत

असून यंदा कुणाची सत्ता येणार याची उत्सुकता लागली आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीच्या वेळी ग्रामपंचायत निवडणुकी पूर्वी जिल्हापरिषद निवडणुकीत काँग्रेसला सोडून भाजप मध्ये येऊन जिल्हापरिषद निवडणूक लढवली होती व त्यात त्यांचा थोडक्यात पराभव झाला होता आणि हा पराभव अनेकांना जिव्हारी लागला होता तरी त्यात ते खचून न जाता त्यानंतर तीनच महिन्यात जाहीर झालेल्या ग्रामपंचायत निवडूणुकीत पक्षांनी सोपवलेली जबाबदारी खांद्यावर घेत



ऐन ग्रामपंचायत निवडूक जाहीर झाल्यानंतर गावातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक योगदान असलेले दोन टर्म सरपंच असलेले माजी सरपंच हिराचंद माशाळे यांचे अपघाती दुर्दैवी निधन झाले असल्याने त्याच बरोबर प्रत्येक निवडणुकीत महत्वपूर्ण भूमिका बजावणारे शावरसिध्द शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शामराव पाटील यांचेही गेल्या वर्षी आकस्मित निधन झाले व गेल्याच महिन्यात माजी सरपंच शरणु गोतसुर्वे यांचेही निधन झाल्याने अश्या वातावरणात निवडणूक न घेता त्यांना श्रध्दांजली म्हणून पक्षभेद विसरून ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करावी असे आवाहन माजी सरपंच बलवान गोतसुर्वे यांनी केले आहे.

%० वर्षांची काँग्रेसची सत्ता पालटून एक हाती भाजपची सत्ता आणली होती. यावेळी सुध्दा सरपंच थेट निवडणूक होत असल्याने व सरपंचपद हे नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिले साठी आरक्षित असल्याने वातावरण सुप्त तापल्याचे दिसून येत आहे. इच्छुकांच्या व पॅनलच्या गुप्त बैठका होत आहेत या मध्ये विद्यमान सरपंच रमेश क्षीरसागर, भाजपा अनु जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे, हारून बिराजदार, जयशंकर पाटील, दत्ता पाटील या प्रमुखांबरोबरच अनेक नवीन चेहरे आपल्या अर्धांगिनींना रणागंणात उतरून मोर्चेबांधणी करीत असल्याचे चित्र असून मुख्य लढत भाजप काँग्रेसमध्ये होत असली तरी जिप पसं निवडणुका पुढे असल्याने भाजपच्याच बलवान गोतसुर्वे यांचा कल अजून दिसून येत नसल्याचे चित्र असून तिसरी आघाडी ही निर्माण होत असल्याचे चित्र आहे. यामुळे अनेकात संभ्रम आहे.

# महाडिकांच्या भोवतालच्या चार पाटलांचे चार गणिती सूत्र

## सोलापूरच्या राजकारणात नवा सिद्धांत

**विजय गायकवाड**

**'पॉवरफुल पीपल कम फ्रॉम पॉवरफुल प्लेसेस' केजीएफ मधील हा डायलॉग आठवण्याचे कारण म्हणजे मोहोळ तालुक्यातील भीमा सहकारी साखर कारखान्याची झालेली निवडणूक. या निवडणुकीत कोल्हापूर येथील खा. धनंजय उर्फ मुन्ना महाडिक यांनी कोल्हापूर वरून येत एकतर्फी विजय मिळवला. या निवडणुकीत त्यांच्या भोवती चार पाटलांचे राजकारण फिरले. त्यात कुणी मायनस (वजाबाकी) झाले. कोणी प्लस (बेरीज) झाले. कोणी मल्टिपल (गुणाकार) तर कोणी डिव्हिजन (भागाकार) करण्याचा कित्ता गिरवला आहे. हे होत असताना मालकांची बाकी मात्र शून्य राहिली आहे. एकूणच भीमा कारखान्याच्या निवडणुकीच्या गणितामुळे नवे सूत्र तयार होत असून सोलापूरच्या राजकारणात नवा सिद्धांत मांडला जाईल, अशी राजकीय जाणकारांमध्ये चर्चा आहे. मुन्ना महाडिक यांच्या भोवतालच्या या चार पाटलांचे चार प्रकारच्या गणितात वर्गीकरण करता येईल. हे एक या निवडणुकीचे वैशिष्ट्ये म्हणावे लागेल.**

### – राजन पाटील पिता- पुत्र मायनस



मोहोळच्या राजकारणात गेल्या अनेक वर्षापासून एक हाती वर्चस्व अबाधित राखणारे माजी आमदार राजन पाटील हे या निवडणुकीत पूर्णतः मायनसमध्ये गेले आहेत. सोलापूरच्या लोकसभा निवडणुकीत असो किंवा मोहोळच्या विधानसभेच्या निवडणुकीत असो अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजन पाटील पिता- पुत्रांनी या निवडणुकीत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या. मात्र त्यांना ठोस पुराव्यानिशी गंभीर आरोप ही करता आला नाही, की विकासाची ब्लू प्रिंट ही सादर करता आली नाही. सभांचा सपाटा लावूनही त्यांना मोहोळच्या मातीतील या कारखान्याच्या निवडणुकीत चितपट व्हावे लागले. कोल्हापूरच्या पैलवानाने बेरजेचे राजकारण केल्याने राजन पाटील पिता पुत्रांचे भीमा कारखान्यातील राजकारण टोटल मायनसमध्ये गेले आहे.

### + उमेश पाटील प्लसमध्ये





मोहोळच्या राजकारणात माजी आमदार राजन पाटील यांच्या विरोधात रान पेटवण्याचे काम त्यांच्याच पक्षातील उमेश पाटील यांच्यामार्फत गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. फ्री हिट वर फलंदाजी करणारा खेळाडू बिनधास्त फटकेबाजी करतो त्या पद्धतीने उमेश पाटील यांनी गेल्या काही दिवसांपासून राजन पाटलांविरोधात बोलण्याची एकही संधी सोडली नाही. भीमा कारखान्याच्या निमित्ताने तगडा विरोधक समोर येताच त्यांनी धनंजय महाडिकांना हात मिळवणी केली आणि प्रचार सभांमध्ये विरोधी रान पेटवण्याचा एककलमी कार्यक्रम राबवला. यामध्ये महाडिकांचा विजय झाला असला तरी एकूणच राजकारणात उमेश पाटील आणखीनच प्लस मध्ये आले आहेत.

### X अभिजीत पाटील होताहेत मल्टिपल



एका मागोमाग एक अनेक कारखाने ताब्यात घेण्याचा सपाटा लावलेले अभिजीत पाटील हे सोलापूरच्या सहकार क्षेत्रातील नवा ब्रँड बनत आहेत. अशातच त्यांनी देखील धनंजय महाडिक यांच्या सोबत राहणे पसंत करून शेवटच्या काही सभांमधून महाडिकांना आपला सपोर्ट असल्याचे दाखवून दिले आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक आणि माजी आमदार राजन पाटील यांच्या गटाला पाठिंबा देण्यापेक्षा महाडिक गटाच्या पाठीशी राहणे हे बेरजेचे असल्याचे अभिजित पाटील यांनी ओळखले. त्यामुळे अभिजीत पाटील यांचे सोलापुरातील सहकारातील अगोदरच प्लस मध्ये असलेले राजकारण पुन्हा मल्टिपल (गुणाकार) होत चालले आहे.

### ÷ सतेज पाटलांची डिव्हिजन मोहीम



खा. धनंजय महाडिक यांचे काका माजी आमदार महादेवराव महाडिक यांच्याकडे एकेकाळी कोल्हापूर जिल्ह्याची सर्व सत्तासूत्रे एकवटलेली होती. 'कुटं भी हुडीक मुन्ना महाडिक' असे चित्र होते. त्यांच्यासोबतच सतेज पाटील यांनी राजकीय प्रवास सुरू केला. तेव्हा धनंजय महाडिक हे त्यांचे मित्र होते. शिवसेनेकडून पहिल्या लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर पुढे धनंजय महाडिक राष्ट्रवादीकडून निवडून आले. तेव्हा पाटील यांनी मदत केली नाही, असा आरोप करून महाडिक यांनी पाटील यांच्याविरोधात विधानसभा निवडणुकीला मोहीम उघडली. विधानसभा निवडणुकीतील पराभव सतेज पाटील यांना जिव्हारी लागला. तेव्हापासून त्यांनी महाडिक विरोधी मोहीम सुरू केली. त्याची सुरुवात नोव्हेंबर २०१५ मध्ये कोल्हापूर महापालिकेच्या निवडणुकीत सत्ता मिळवून केली.पुढे विधान परिषद, लोकसभा विधानसभेत सलग नमवत 'खटक्यावर बोट जाग्यावर पलटी'ची किमया साधली. म्हणजेच सर्व सत्ता केंद्र ताब्यात घेत महाडिक यांची सत्ता डिव्हीजन (भागाकार) करण्याचे काम सुरू केले.


# आराखड्याचे राजकारण तापले

## वोट बँकेसाठी विकासाच्या आड नेतेमंडळी

**सूरज सरवदे**

लोकसभा विधानसभा नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये पंढरपूरकरांना विकासाचे गाजर दाखवण्यात येते मात्र विकास आराखडा तयार करण्याची वेळ आली आहे, त्यावेळी मात्र वोट बँकेचे राजकारण करण्यासाठी पुढारी पुढे येत आहेत. विकास आराखड्याला विरोध करत आहेत. मात्र विकास आराखडा झाल्यानंतर पंढरपुरात रोजगार वाढणार आहे. पंढरपूरचे उत्पन्न वाढणार आहे. मात्र विकासाला विरोध करून पंढरपूर भकास करण्याचा प्रयत्न नेतेमंडळी करताना दिसत आहेत.

पंढरपूर विकास आराखड्याला सर्वच पक्षांनी विरोध केला आहे. वारकरी संघटनाही त्यामध्ये सामील झाल्या आहेत. पंढरपूर नगरपालिकेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सर्वच पक्षांनी विकास आराखड्याला विरोध दर्शविला आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक यांना विरोध करण्याच्या नादात मनसेसह सर्वच विरोधी पक्ष संघटना आराखड्याला विरोध करत समोर आल्या आहेत. नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर परिचारक यांना टार्गेट करण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. मात्र परवा नगरपालिकेवर व्यापाऱ्यांनी विकास आराखड्याला विरोध करत मोर्चा काढला होता. त्यामध्ये प्रणव परिचारक सहभागी झाल्यामुळे विरोधकांना विकास आराखड्याच्या माध्यमातून परिचारक यांना विरोध करणाऱ्यांचे तोंड बंद केले आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना निवेदन देऊन मंदिर परिसरात कॉरिडॉर करण्याची गरज नसल्याचे सांगितले. तर आमदार समाधान अवताडे यांनी करिडॉर कसा असणार आहे? त्याबाबत नागरिकांना काय वाटते? त्यांच्याकडून सूचना, हरकती घेऊन नागरिकांना केंद्र बिंदू ठेवून विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत तसेच पंढरपूर शहरातील रस्ते, नदीकाठच्या घाटांचा विकास करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



### ■ रहिवाशांमध्ये मोबदल्याबाबत गैरसमज

विकास आराखड्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकारण सुरू केले आहे. मात्र मंदिर परिसरातील व्यापारी, रहिवाशांना काय वाटत या बाबतीत कोणीही त्यांची भूमिका समजून घेताना पुढे येत नाही. प्रत्येकजण राजकारण करण्यात दंग आहेत. व्यापाऱ्यांचे, रहिवाशांचे पुनर्वसन कारणासाठी, त्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी प्रशासनाशी कोणीही चर्चा करताना दिसत नाही. व्यापारी, रहिवाशांमध्ये मोबदल्याबाबत गैरसमज पसरवण्यात व्यस्त आहेत.

### ■ स्थानिकांचे मत आवश्यक...

विकास आराखड्यात बाधित होणाऱ्या व्यापारी, रहिवाशांचे तीन मतप्रवाह समोर आले आहेत. योग्य मोबदला दिला तर आम्ही जागा देऊ, मोबदला किती मिळतो ते पाहून निर्णय घेऊ आणि कितीही मोबदला दिला तरी जागा देणार नाही, असे तीन मत प्रवाह समोर आले आहेत. राजकारण न करता जास्तीत जास्त मोबदला मिळवण्यासाठी नेते मंडळींनी प्रयत्न करायला हवेत.

# सावंतांचा माढ्यात जोर वाढणार का?

**उल्हास पाटील**


माढा तालुक्यामध्ये बाळासाहेबांची सेना वाढवण्यासाठी मोठे आव्हान असून आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या होम मैदानात मुख्यमंत्री शिंदे सेना वाढण्यासाठी यश मिळणार का? याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

माढा तालुक्यातील वाकाव येथे येथील रहिवाशी असलेले शिक्षण महर्षी तानाजी सावंत हे मुख्यमंत्री शिंदे गटात सहभागी होऊन मंत्री झाले. मात्र त्यांच्या होम मैदानात माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे सहा वेळा निवडून आले असून तालुक्यामधील त्यांच्या विकास कामामुळे त्यांची ताकद अधिकच वाढली आहे. याच बरोबर साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यात मोठे पाठबळ मिळाले आहे. तर करमाळा मतदार संघामध्ये समावेश झालेले कुर्डूवाडी नगरपालिकेत उद्धव ठाकरे सेनेचे धनंजय डिकोळे यांच्या चाणक्य राजकारणामुळे २५ वर्ष नगरपालिकेवर सेनेची सत्ता आहे. गरज पडली तर त्यांनी राजकीय समीकरण बदलत कधी युती, महाआधाडी तर मैत्री करून नगरपालिकेवर सत्ता मिळवली यामुळे कुर्डूवाडी यांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. तर कुर्डूवाडी शहरात मुख्यमंत्री शिंदे गटाचे समाधान दास व पदाधिकारी शहरात काम करीत आहेत. त्यांची ताकद वाढवण्याची धडपड सुरू आहे. मात्र दास यांना सावंतांकडून पाठबळ मिळत नसल्याचे सध्या तरी चित्र दिसत आहे. आगामी निवडणुकीमध्ये सावंत गटाचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडणूक लढवणार का? हे येणाऱ्या दिवसात चित्र स्पष्ट होईल. विधानसभेच्या पंचवार्षिक निवडणुकीत करमाळ्याचे संजय शिंदे हे आमदार झाल्याने त्यांनीही त्यांचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात निर्माण करून ठेवले आहे. याचबरोबर माढा नगरपंचायतीवर माजी आमदार धनाजी साठे यांचेही वर्चस्व आहे. यापूर्वी ग्रामपंचायत असतानाही धनाजी साठे व त्यांचे पुत्र दादासाहेब साठे यांनी माढा शहर व ग्रामीण भागात त्यांचे अस्तित्व निर्माण करून ठेवले होते. माढा पंचायत समितीमध्ये आमदार बबनराव शिंदे यांचेही वर्चस्व सातत्य टिकून राहिले आहे. सभापती म्हणून विक्रमसिंह शिंदे यांनी गेल्या पंचवार्षिकमध्ये कामकाज पाहिले होते.



### अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार

तालुक्यातील वर्चस्व पाहता सावंत यांना मुख्यमंत्री सेना वाढवण्याचे मोठे आव्हान असल्याचे सध्यातरी चित्र दिसत आहे. शिंदे सेना वाढवण्यासाठी काम करीत असल्याचे सध्या तरी सावंत दिसत नाहीत. आगामी पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सावंत गटाच्या हालचालीला वेग दिसत नाही तसेच कुर्डूवाडी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीही सध्या सर्वत्र शांत वातावरण दिसत आहे. यामुळे सावंतांना मुख्यमंत्री शिंदे सेना वाढवण्यासाठी मोठी ताकद लावावी लागणार आहे. या सर्व आव्हानांना तोंड देत त्यांना सेना वाढवावी लागणार आहे.



# राहुल..बदलाची चाहूल.. पण... अखेर मुद्दा सापडलाच

**डी.एस.गायकवाड**

कधी घावतोय कधी घावतोय असा नेम धरून बसलेल्या भाजपाला अखेर राहुल गांधींच्या वक्तव्यातील विदा सावरकरांचा मुद्दा सापडलाच आणि तोच कित्ता गिरवायला आता भाजपा रस्त्यावर उतरलेली दिसत आहे. महाराष्ट्रात भारत जोडो यात्रेला मिळत असणारा उदंड प्रतिसाद आणि त्याच नैराश्यातून अखेर भाजपाला मिळालेला मुद्दा यातून भविष्यात या यात्रेवर टीकास्त्र सोडले जाईल आणि निर्माण झालेले वातावरण बदलण्याचा पुरेपूर प्रयत्न होईल, यात शंका नाही.

भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून सध्या राहुल गांधी भारतीयांची वेगवेगळ्या विषयावरून मने जोडताना दिसत आहेत. ते महाराष्ट्रात फिरू लागल्यापासून त्यांच्या यात्रेची सर्वत्र चर्चा सुरू आहे. वेगवेगळ्या भागातून त्यांच्या यात्रेला समर्थन देखील मिळताना दिसत होते पण कुठे माशी शिंकते याचीच वाट पाहत बसलेल्या भाजपाला अखेर एक मुद्दा मिळालाच आणि या मुद्याभोवतीच त्यांनी घिरट्या घ्यायला सुरुवात केली. देश पातळीवर अनेक मुद्दे आहेत त्यात प्रामुख्याने महागाईचा मुद्दा असेल किंवा अन्य इडीच्या दबावंत्राचा मुद्दा असेल असे अनेक मुद्दे आज सध्या सर्वांसमोर आहेत आणि या मुद्द्यावरून भाजपा विरोधात गटबांधणीला वेग आला असताना वि. दा. सावरकरांचा मुद्दा राहुल गांधी बोलून गेले आणि तोच धागा पकडत भाजपाने रान उठवायला सुरुवात केली. त्यामध्ये त्यांनी शिवसेनेचीही कोंडी केली. अगदी महाविकास आघाडीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल, असे वातावरण निर्मित व्हायला सुरुवात झाली. मुळात विदा सावरकर यांच्या मुद्द्याबाबत अनेकांचे वेगवेगळे मत असू शकते. कोणी समर्थन करेल किंवा कोणासाठी हे असमर्थनीय असेल. हा ज्याच्या त्याच्या विचाराचा भाग आहे पण त्यावरून राजकीय एकता दुभंगली जाईल, अशी मांडणी करणे चुकीचे आहे. शिवसेना पक्ष हिंदुत्ववादी आहे किंवा तो अलीकडील काळात सर्व धर्मांना बरोबर घेऊन आधुनिक हिंदुत्ववादाकडे चालला आहे असे असू शकते. पण आता त्या एका मुद्द्यावरून भाजपाने शिवसेनेकडे केलेले बोट हे काँग्रेसचे अर्थात महाविकास आघाडीचे बळ कमी करण्यासाठी केलेला प्रयोग आहे असे म्हणायला हरकत नाही. आता राहुल गांधी किंवा इतर भाजप विरुद्ध नेत्यांनी वैचारिक वाद न उकरता चालू परिस्थितीतील मुद्द्यावर एकतेचे निशाण फडकवले पाहिजे. त्यासाठी सर्वांनाच सावध व्हावे लागेल. टपून बसलेल्या भाजपाला हरवायचे असेल तर एकजुट तर हवीच पण त्याचबरोबर काही जुन्या वादांना किंवा वादग्रस्त मुद्द्यांना हात न घालता चालू परिस्थितीतील मुद्द्यावर भाष्य करावे लागेल.जुना वादग्रस्त मुद्दा उगाळत बसण्यापेक्षा एकतेची वज्रमूठ आवळून लढावे लागेल. भारत जोडोच्या निमित्ताने तोडोची भाषा आता वापरून चालणार नाही प्रत्येक मनाला आणि वेगवेगळ्या विचारांच्या लोकांना एकत्र घेऊन संघर्षाची तयारी करावी लागेल तरच भारत जोडो सार्थकी लागेल आणि भाजपा विरोधातील रान सुपिक होईल.




# ही तर झेडपीची रंगीत तालिमच...

**निलेश उबाळे**







**बार्शी तालुक्यातील २२ ग्रामपंचायतीचे बिगुल वाजले आहे, त्यापैकी १३ ग्रामपंचायती ह्या वैराग भागातील आहेत. बार्शी तालुक्याचा राजकीय केंद्रबिंदू वैराग भागाला समजले जाते तर वैराग भागाचा राजकीय केंद्रबिंदू जोतीबाच्यावाडीला (जवळगाव)समजले जाते. त्याची कारणेही अशीच काहीशी आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतींवर कुणाचा झेंडा फडकणार यावर वैराग भागासह तालुक्याचे लक्ष असते.**

जवळगाव ग्रामपंचायतीची स्थापना १९५२ साली करण्यात आली. स्थापनेच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये दत्तात्रय केरबा कापसे हे सरपंच झाले. तिथून पुढे दहा वर्ष ते सरपंच होते. त्यानंतर १९६२ ते १९६७ या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये कृष्णात निवृत्ती ढेंगळे हे सरपंच झाले. त्यानंतर १९६७ ते १९७२ या काळामध्ये उद्धव दत्तू कापसे हे सरपंच राहिले १९७२ ते १९७८ या काळामध्ये पुन्हा कृष्णात निवृत्ती ढेंगळे हे सरपंच होते तर १९७८ ते ८९ यावेळी त्र्यंबक देविदास कापसे हे सरपंच होते. ते वयाच्या २६ व्या वर्षी सरपंच झाले. त्यानंतर या जवळगावमध्ये टर्निंग पॉईंट ठरला, तो मध्यम प्रकल्प, भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने ज्या ठिकाणी जवळगाव वसले होते त्याच ठिकाणी जवळगाव मध्यम प्रकल्प निर्माण करण्यात आला. त्यामुळे या जवळगावचे दोन भाग झाले. जोतिबाचीवाडी आणि अंबाबाईचीवाडी. त्यानंतर १९८९ ते १९९२ या तीन वर्षात प्रशासक राजवट होती.

प्रशासक कार्यकाळ पूर्ण होताच जोतिबाचीवाडी आणि अंबाबाईचीवाडी अशी वेगवेगळी निवडणूक झाली. जोतिबाचीवाडी १९९२ ते १९९७ या काळात अरुण कापसे हे सरपंच राहिले. त्यानंतर १९९७ पासून आज तागायत २०२२ पर्यंत सभापती अनिल डिसले यांच्या हातात सत्ता आहे.

२००७ ते २०१२ या काळामध्ये पारंपारिक विरोधक असलेले अरुण कापसे आणि अनिल डिसले यांनी एकत्रित येऊन ग्रामपंचायत लढवली होती. यावेळी त्यांना यश देखील मिळाले यातून अनिल डिसले यांचे बंधू तुकाराम डिसले सरपंच झाले तर अरुण कापसे यांचे पुतणे विकास कापसे उपसरपंच म्हणून कार्यरत होते. त्यामुळे जवळगाव मध्ये सत्तेची समीकरणे कधी कशी फिरतील हे सांगणे कठीण आहे. जोतिबाचीवाडी हे गाव जवळगाव मध्यम प्रकल्पामुळे सदन बनले आहे. गावातील प्रत्येक ग्रामस्थ स्वयंपूर्ण आहे. पारंपारिक विरोधक असणाऱ्या अनिल डिसले आणि अरुण कापसे या दोन्ही गटांना राष्ट्रवादीचे नागेश चव्हाण यांच्या रूपाने नव्या तिसऱ्या गटाकडून आव्हान देण्याची तयारी सुरू आहे. यापूर्वी ग्रामपंचायत निवडणुकीत अनिल डिसले आणि अरुण कापसे यांच्या लढती ह्या तुल्यबळ राहिल्या आहेत आता नागेश चव्हाण यांच्या रूपाने तिसरी शक्ती या लढतीमध्ये उतरत असल्यामुळे याचा फटका नेमका कोणाला बसणार आणि फायदा कोण उचलणार की दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ होणार हे सर्व काही सुज्ञ मतदारांवर अवलंबून आहे.

यापूर्वी नागेश चव्हाण यांनी गतवेळी मनसेमधून बार्शी विधानसभेची निवडणूक लढवली आहे तसेच ते छावा या सामाजिक संघटनेचे पदाधिकारी आहेत. तरुणांची चांगली फळी त्यांनी उभा केली असून सद्या ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय आहेत. या गावाने जिल्हा परिषदेला सदस्य, पंचायत समितीला सभापती, राज्य लेबर फेडरेशनला अध्यक्ष, राज्य माथाडी उपाध्यक्ष दिले आहेत तर राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये उच्च पदावर कार्यरत असणारे महान व्यक्तिमत्व देखील या गावांमध्ये आहेत याशिवाय शास्त्रज्ञ आणि संरक्षण खात्यामधील ग्रामस्थ आणि गाव सोडून बाहेर गेलेले यशस्वी व्यावसायिक हे या गावाची शान वाढवत आहेत. त्याचबरोबर अरुण कापसे यांचा माध्यमातून राज्यमंत्री पदाचा दर्जा असणारे पदही गावात आले आहे.

### गणित बिघडणार की घट्ट होणार?

एकूणच जवळगावामध्ये अनेक मातब्बर व्यक्ती असल्या तरी आजपर्यंतचे राजकारण मात्र डिसले आणि कापसे यांच्यामध्येच सुरू असल्याचे दिसले. मात्र आता यामध्ये चव्हाण यांची एन्ट्री झाल्यामुळे यांचे गणित बिघडणार की आणखीन घट्ट होणार हे येणाऱ्या काळातच कळणार आहे ...

# प्रभावी महिला नेतृत्वाची बार्शीत वानवाच!

**सचिन आपसिंगकर**

स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या ७५ वर्षाच्या काळात बार्शी विधानसभा मतदार संघावर दोन महिला आमदारांनी आपला प्रभावी ठसा उमटविला मात्र सद्यस्थितीमध्ये बार्शी तालुक्यात प्रभावी महिला नेतृत्व नाही. तालुक्यात आपल्या सर्व समावेक्षक कार्यपध्दतीमधून शहर आणि ग्रामीण भागात कोणतेही महिला नेतृत्व फारसे सक्रिय नाही. विविध क्षेत्रामध्ये आघाडीवर असणाऱ्या महिलांची संख्या मोठी आहे. पण राजकारणात मात्र महिलांचा आवाज दमलेलाच दिसतो. ५०% आरक्षणामुळे महिला नगरसेविका, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच सहकारी संस्थावर महिला संचालक म्हणून निवडून येतात पण त्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये स्थान आहे. निवडूण आलेल्या महिला पदाधिकाऱ्यांचे पती, दीर, मुलगा अथवा भाऊ हेच सदस्य म्हणून मिरवताना दिसतात. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सभागृहात महिला आपले मत मांडताना दिसत नाहीत. केवळ आरक्षणामुळे महिला सदस्य निवडून आल्या आणि नंतर त्या केवळ औपचारिकच सक्रिय राहिल्या अशी सार्वत्रिक परिस्थिती आहे.

बार्शी तालुक्यात प्रभाताई झाडबुके यांनी २३ वर्षे बार्शी शहराचे नगराध्यक्षपद भूषवले. त्या विधानपरिषदेवर सदस्य म्हणून निर्वाचीत झाल्या. व्यासंगी वक्त्या म्हणून त्या विधी मंडळातही गाजल्या. त्यांच्या समकालीन श्रीमती. शैलजाताई शितोळे यांनीही आमदार म्हणून प्रभावी काम केले. त्यानंतर बार्शी शहरात श्रीमती.शोभाताई बागल या नऊवेळा नगरसेविका म्हणून निवडून आल्या. त्यांना उपनगराध्यक्ष पदाचीही संधी मिळाली. श्रीमती. बागल यांचा सर्वसामान्यांशी मोठा संपर्क होता. त्यांची कारकिर्द सातत्याने नगरपालिकेच्या सभागृहात जनतेचे प्रश्न मांडल्यामुळे गाजली. त्यांनतर मंगलताई शेळवणे यांना बार्शी शहराचे नगराध्यक्ष पद भूषविण्याची संधी मिळाली. मात्र हे काही सन्माननीय अपवाद वगळता पालिकेच्या सभागृहात महिला नगरसेविका स्थानिक प्रश्न नेमकेपणाने मांडू शकलेल्या नाहीत. त्यांची आपल्या गटात गळचेपी झाल्याचेच चित्र आहे.

बार्शीतल्या कोणत्याही राजकीय पक्षात महिला नेतृत्व सतत सक्रिय राहिलेले नाही. त्यांना राजकीय कार्य करताना अनेक मर्यादा आल्याचेच जाणवले आहे. सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या म्हणून प्रभावी काम करणाऱ्या महिला डावलल्या गेल्याचीच अनेक उदाहरणे आहेत. बार्शी हे सोलापूर जिल्ह्यातील शैक्षणिकदृष्ट्या चांगले शहर मानले जाते मात्र त्यामानाने बार्शी शहराच्या राजकारणात सुशिक्षित महिला नेतृत्व पुढे आलेले नाही. समाजकारण, वकीली, वैद्यकीय, साहित्य, कला, सांस्कृतिक क्षेत्रात बार्शीचा नावलौकीक गाजवणाऱ्या महिला बार्शीत आहे पण त्यांनी राजकारणाकडे पुरूष प्रधान मानसिकतेमुळे पाठ फिरवल्याचेच चित्र आहे.

### सक्रीय होण्याची गरज

आता नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती या महत्वाच्या संस्थाच्या निवडणुका अगदी तोंडावर आहेत. पुरूष प्रधान राजकीय सांस्कृतीला नाकारून सुविद्य, कार्यक्षम, धाडसी महिलांनी बार्शीच्या राजकारणात सक्रिय होण्याचे गरज आहे.

